# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव विभाग

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/ २०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०६/०८/२०२४ चे ठराव.**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८४७** — **विषय क्रमांक- ३८४७**

**दिनांक – ०६/०८/२०२४** — **विभाग- जलनि:सारण ब क्षेत्रिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८४७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/जनि/कावि/७८०/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मनपाचे 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे या कामास मुदतवाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८४७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/जनि/कावि/७८०/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणेकामी (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) मे. आर्यन पंप्स अँड एनव्हायरो सोल्यु. प्रा. लि. हे ठेकेदार काम करीत आहेत. निविदा क्र. २२/२/२०१८-१९ सदर कामाचे निविदा अटी व शर्ती (A) क्र. ३ नुसार व प्राप्त दर र.रु.४३,०००/- रुपये प्रती दिन निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील व १ वर्षानंतर भाववाढ फरक देय राहील असे नमूद आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.४९८२, दि.१२/०७/२०१९ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. कामाच्या पाचवे वर्षासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२५८६, दि.०९/११/२०२३ नुसार सदर कामास निविदे मध्ये प्राप्त र.रु.४३,०००/- प्रतीदिन दरानुसार र.रु.१,२९,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळाली आहे. ठेकेदार मे.आर्यन पंप्स अँड एनव्हायरो सोल्यु. प्रा. लि. यांनी सदरचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे. सद्यस्थितीत पाचवे वर्षाची मुदत पूर्ण होत असल्याने पुढील १ वर्षाकरिता (सहावे वर्ष) मुदतवाढ देणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८४८** — **विषय क्रमांक- ३८४८**

**दिनांक – ०६/०८/२०२४** — **विभाग- मध्यवर्ती भांडार**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८४८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभा/१५/कावि/८८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मनपा वैद्यकिय विभागांतर्गत रुग्णालयास ऑर्थो शिट, होल शिट, पांढरे ऑपथॉल्मिक शिट, ग्रिन ड्रॉ शिट व सर्जन गाउन लिनन हॉस्पिटल लिनन खरेदी करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८४८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.मभा/१५/कावि/८८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयातील रुग्णांचे सेवेसाठी आवश्यक ऑर्थो शिट, होल शिट, पांढरे ऑपथॉल्मिक शिट, ग्रिन ड्रॉ शिट व सर्जन गाउन मे. महाराष्ट्र राज्य हातमाग |

| | |
|---|---|
| | सहकारी महासंघ, यांचे १० बाबींसाठी र.रु.71,55,053/- मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचे १ बाबींसाठी र.रु.5,70,360/- व मे. खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेकडून २ बाबींसाठी र.रु.47,570/- दर करारानुसार करारनामा न करता थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण र.रु.77,72,983/- (अक्षरी र.रु.सत्याहत्तर लाख बाहत्तर हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) चे खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८४९** **विषय क्रमांक- ३८४९**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- भूमि आणि जिंदगी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८४९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/एसआर/०७/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मौजे चिखली गावठाण येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शाळा क्रं. ९०९१ मधील ०२ खोल्या अपर तहसिलदार पिंपरी चिंचवड अंतर्गत मौजे चिखली येथील तलाठी कार्यालयास उपलब्ध करून देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८४९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/एसआर/०७/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मौजे चिखली येथील तलाठी कार्यालयासाठी महानगरपालिकेची जुनी मराठी शाळेची इमारतीमधील तळमजल्यावरील २ खोल्या मिळणेबाबत मागणी तलाठी, चिखली, ता. हवेली, जि. पुणे यांनी शिक्षण अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे केली आहे. तलाठी चिखली यांचे दिनांक १२/१२/२०२३ रोजीचे पत्र प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग यांनी क्र. शिक्षण/सशि/१५/कावि/५५७/२०२३, दि. २०/१२/२०२३ अन्वये भुमि- जिंदगी विभागाने वर्ग केलेले आहे. उपसंचालक, नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी चिखली शाळा इमारतीचे मुल्यांकन करुन दिले आहे. मौजे चिखली गावठाण येथील शाळा क्र.९०९१. मधील पहिल्या मजल्यावरील दोन वर्ग खोल्या तलाठी चिखली यांना कार्यालयासाठी देणे शक्य आहे. गावकामगार तलाठी चिखली यांनी कार्यालयासाठी मागणी केलेल्या मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. |

| अ क्र | जागेचा तपशील | कार्यालयाचे / विभागाचे नांव | क्षेत्राचा तपशील | क्षेत्रफळ (चौ. फुट) | दर (प्रति चौ फुट) | कराव्यतिरिक्त मासिक भाडे | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मौजे चिखली गावठाण महानगरपालिका मालकीचा शाळा क्र. ९०९१. | तलाठी साझा कार्यालय चिखली. | पहिल्या मजल्यावरील २ खोल्या. | ३८३.५८ चौ. फुट. | २६.१० | १००१२/- | ५ वर्षे |

मौजे चिखली गावठाण येथील शाळा क्र ९०९१. मधील पहिल्या मजल्यावरील दोन वर्ग खोल्या तलाठी चिखली यांना कार्यालयासाठी ५ वर्षे कालावधीसाठी जागा भाड्याने देणेस महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ 'ब' नुसार मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५०** **विषय क्रमांक- ३८५०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१०/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मनपाचे रावेत मैलाशुध्दीकरण केंद्र अतंर्गत मैलापाणी पंप हाऊचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१०/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.07/05/2023-24 अन्वये मनपाचे रावेत मैलाशुध्दीकरण केंद्र अतंर्गत मैलापाणी पंप हाऊसचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र.07/05/2023-24 साठी 5 प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.एक्सेल इंजिनीअर्स या ठेकेदाराची नि.र.रू.1,31,74,404/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकतीस लाख चौ-याहत्तर हजार चारशे चार फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,31,74,404/- पेक्षा 4.5% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक:30/07/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.1,25,81,556/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.1,25,81,556/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर लागू असल्यास अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५१** **विषय क्रमांक- ३८५१**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२११/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मनपाचे कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र फेज- 2 अतंर्गत मैलापाणी पंप हाऊचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२११/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.07/02/2023-24 अन्वये मनपाचे कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र फेज- 2 अतंर्गत मैलापाणी पंप हाऊसचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 07/02/2023-24 साठी 3 प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.एक्सेल इंजिनीअर्स या ठेकेदाराची नि.र.रू.3,99,46,680/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी नव्यान्नव लाख शेहेचाळीस हजार सहाशे ऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,99,46,680/- पेक्षा 4.3% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम |

| | |
|---|---|
| | मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक:29/7/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.3,82,28,973/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 0/- मटेरियल टेस्टींगचार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु.3,82,28,973/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर लागू असल्यास अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिनराहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५२** **विषय क्रमांक- ३८५२**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य ब मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य ब मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१५/कावि/२३८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, सन २०२३-२४ करीता मनपाचे प्रभाग क्र.१८ परीसरामध्ये विविध कंपन्या/मनपा मार्फत खोदण्यात आलेले चर दुरूस्त करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य ब मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१५/कावि/२३८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.79/03/2023-24 अन्वये सन २०२३-२४ करीता प्रभाग क्र.१८ परीसरामध्ये विविध कंपन्या/मनपा मार्फत खोदण्यात आलेले चर दुरूस्त करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 79/03/2023-24 साठी 3 प्राप्त झालेल्या निविदांपैकी M/s. Bahirat Borthers या ठेकेदाराची नि.र.रू.37,42,261/- (अक्षरी रक्कम रुपये सदोतीस लाख बेचाळीस हजार दोनशे एकसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.35,84,331/- पेक्षा 32.52% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. सह शहर अभियंता यांनी दिनांक:29/07/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.24,18,707/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.21,781/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,57,930/- = एकुण र.रु.25,98,418/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५३** **विषय क्रमांक- ३८५३**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य क मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य क मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१५/कावि/२३९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.२ मधील परिसरात मनपा विषयक कार्यक्रमांसाठी मंडप विषयक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य क मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१५/कावि/२३९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 79/11/2023-24 अन्वये प्रभाग क्र. २ मधील परिसरात मनपा विषयक कार्यक्रमांसाठी मंडप विषयक कामे करणेकामी (सन २०२३-२४) वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 79/11/2023-24 साठी 3 प्राप्त झालेल्या निविदांपैकी M/s. Jagwani Dheeren Lalchand या ठेकेदाराची नि.र.रू.31,30,708/- (अक्षरी रक्कम रुपये एकतीस लाख तीस हजार सातशे आठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.31,30,708/- पेक्षा 10% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. सह शहर अभियंता यांनी दिनांक:22/07/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.28,17,637/- + रॉयल्टी चार्जेस र.रु. 0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु.28,17,637/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५४** **विषय क्रमांक- ३८५४**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य ह मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य ह मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१२/कावि/५३९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, सन २०२३-२४ करिता सांगवी मधील मधूबन, शितोळेनगर व इतर परिसरातील पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह शहर अभियंता, स्थापत्य ह मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१२/कावि/५३९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 85/07/2023-24 अन्वये सन २०२३-२४ करिता सांगवी मधील मधूबन, शितोळेनगर व इतर परिसरातील पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 85/07/2023-24 साठी 8 प्राप्त झालेल्या निविदांपैकी पात्र झालेल्या निविदांपैकी M/s.Shivam Enterprises या ठेकेदाराची नि.र.रू. 44,98,347/- (अक्षरी रक्कम रुपये चव्वेचाळीस लाख अठ्ठ्याण्णव हजार तीनशे सत्तेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून |

| | |
|---|---|
| | र.रु.44,72,382/- पेक्षा 35.05% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.सह शहर अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.29,04,812/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.47,066/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.25,965/- = एकुण र.रु.29,77,843/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५५** **विषय क्रमांक- ३८५५**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य ब क्षेत्रीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), स्थापत्य ब क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/७/१७२/२०२४, दि.३१/०७/२०२४ अन्वये, मनपाचे ब प्रभागातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), स्थापत्य ब क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/७/१७२/२०२४, दि.३१/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारती व इतर स्ट्रक्चरचे संरचनात्मक परीक्षण अनिवार्य करणेबाबत अधिनियमात केलेल्या सूचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६५ (अ) प्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच " ब " क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सार्वजनिक स्वच्छतागृहांचे स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत संरचनात्मक परीक्षणाकरिता अतिरिक्त गुण मिळत असल्यामुळे सदर स्वच्छतागृहांचे संरचनात्मक परीक्षण करणे गरजेचे आहे. मनपाच्या स्थापत्य विभागाकडे अशा प्रकारचे संरचनात्मक परीक्षण करणेकरीता स्ट्रक्चरल ऑडिटर यांची मा.आयुक्त स्वाक्षरीकृत सूची उपलब्ध आहे. त्यानुसार विभागातील जुन्या इमारतींचे संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) करून घेणेकरिता या सूचीतील अनुभवी स्ट्रक्चरल ऑडिटर मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची स्ट्रक्चरल ऑडीट म्हणून या कामासाठी नेमणूक करून त्यांना कामाचा आदेश देणे व म.न.पा. च्या प्रचलित दरसूचीनुसार फी दरानुसार अदा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५६** **विषय क्रमांक- ३८५६**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- माध्यमिक शिक्षण**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/२१९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना मनपा हद्दीबाहेरील कार्यक्षेत्रामध्ये शिक्षण घेत असलेल्या इ.५ वी ते इ.१० वी तील विद्यार्थी, विद्यार्थ्यांनीनसाठी सवलतीच्या दरात बसपास योजना राबविणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/२१९/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थांनसाठी विविध उपक्रम योजना राबविणेत येत असतात. बहुतांश विद्यार्थी हे आर्थिक दृष्टया मागास घटकातील असलेने या विद्यार्थींना मनपाच्या वतीने मोफत बसपास व इतर खाजगी विद्यालयातील विद्यार्थ्यांकडुन एकुण बसपासच्या २५ टक्के रक्कम ही विद्यार्थ्यांनकडुन वसुल करून बसपास पी.एम.पी.एम.एल.कडुन विद्यार्थ्याना वितरीत करण्यात येते. त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील इ.५वी ते इ.१०वीच्या खाजगी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना २५% व ७५% मोफत बसपास योजना सुरू करण्यात आलेली आहे. परंतु रावेत, मामुर्डी, पिंपळेगुरव सांगवी इत्यादी परिसरातील अनेक विद्यार्थी खडकी, देहूरोड, कॅन्टोन्मेंट, पुणे,पीएमआरडीए परिसरातील शाळामध्ये शिक्षण घेत असुन या विद्यार्थी व विद्यार्थिनींना पी.एम.पी.एम.एल. बसेसमधुन प्रवास करणेसाठी २५% व ७५% सवलतीच्या दरातील बसपास योजना राबविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने दि.१२/०७/२०२४ रोजीचे प्रस्तावान्वये मनपा हद्दीत निवास करत असलेल्या परंतु हद्दीबाहेर परिसरात खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या इ.५वी ते इ.१०वीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना २५% रक्कम चलनाने मनपा कोषागारात भरुन सदरचे चलन अर्जासोबत पी. एम. पी.एम. एल. कडे सादर करुन पास देणेबाबत कार्यवाही करणेकामी मान्यता दिलेली आहे. 'मोफत बसपास योजना' ही मा.महापालिका सभा ठराव क्र.७१६ दिनांक २०/७/२०१५ अन्वये राबविण्यात येत असुन मनपाने ठरवुन दिलेले धोरणानुसार अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. 'मोफत बसपास योजना' ची सुधारीत योजना राबविण्याबाबत नागरीकांनी व लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली असुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत निवास करत आहेत व मनपा हद्दीबाहेरील परिसरात खाजगी शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेल्या इ.५वी ते इ.१०वीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना २५% व ७५% मोफत बसपास योजना धोरण निश्र्चीत करून सदरची योजना राबविणेबाबत आदेश मिळणेबाबत कळविले आहे. तरी सदरची योजना राबविणे हा मनपाचा धोरणात्मक निर्णय असलेने त्यास खाली नमुद केलेल्या बाबीवर मान्यता देणे आवश्यक आहे.<br>१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत निवास करत असलेल्या व मनपा हद्दीबाहेर शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या इ.५वी ते इ.१०वीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना २५% रक्कम चलनाने मनपा कोषागारात भरून सदरचे चलन अर्जासोबत पी.एम.पी. पी.एम.एल. कडे सादर करून पास घेणे व पी.एम.पी.एम.एल. ने वितरीत केलेल्या पासेसच्या ७५% रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन पी.एम.पी.एम.एल. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.<br>पी.एम.पी.एम.एल. यांनी बिल मनपाकडे सादर करणे व सादर केलेल्या बिलापोटी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. या योजने अंतर्गत मनपा शाळेतील शिक्षण घेणा-या इ.५वी ते |

| | |
|---|---|
| | इ.१०वीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बसपासेसमध्ये १००% सवलत असल्याने त्यांना वगळुन योजना सुरू करण्यात आलेली आहे.<br>२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील प्राथमिक व माध्यमिक इ. ५ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना व मनपा हद्दीतील निवासी खाजगी मान्यताप्राप्त व मनपाचे सर्व ५ वी ते इ.१० वी विद्यार्थी व विद्यार्थीनीना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासुन घर ते शाळा व शाळा ते घर अशा स्वरुपाच्या बसपास योजना राबविण्याकामी मार्ग (Route) निश्चित केल्याने मनपाला पासधारकांची निश्चित संख्या ही मनपाला उपलब्ध होईल जेणेकरून दुबार पास, बोगस नावे इ. प्रकारच्या घटना भविष्यात उद्भवणार नाही.<br>तरी सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील निवासी विद्यार्थी परंतु हद्दी बाहेरील परिसरात शिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील इ. ५ वी ते इ.१० वीच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीना २५% बसपास योजना राबविणेकामी व पी.एम.पी.एम.एल. ने वितरीत केलेल्या पासेसच्या उरलेली ७५% रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन पी.एम.पी.एम.एल. यांना अदा करणेस व सदरचे धोरण राबविणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५७** **विषय क्रमांक- ३८५७**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- यांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.यां/३/कावि/२८७/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या ब गटातील वाहनांचे दुरुस्तीकामी एजन्सि निश्चित करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.यां/३/कावि/२८७/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. ३५-१/२०२३-२४ अन्वये पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या ब गटातील वाहनांच्या दुरुस्तीकामी एजन्सि निश्चित करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करणेत आली होती. वरील प्रमाणे निविदांसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. नेहा ऑटोमोटिव्हा पुणे या ठेकेदाराच्या नि.नो.क्र. ३५-१/२०२३-२४ मधील कामासाठी नि.र.रु.१,४६,६६,६४०/- पेक्षा ९.९९% कमी र.रु.१,३२,०१,४४३/- दराने निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्टया वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. आयुक्त यांनी दि.२३/०७/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून नि.नो.क्र.३५-१/२०२३-२४ करीताची मुळ निविदा र.रु.१,४६,६६,६४०/- पेक्षा ९.९९% कमी र.रु.१,३२,०१,४४३/- अधिक नियमानूसार GST या खर्चास मान्यता देणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर (GST) अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५८** **विषय क्रमांक- ३८५८**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- यांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.यां/३/कावि/२८८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या क गटातील वाहनांचे दुरुस्तीकामी एजन्सि निश्चित करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.यां/३/कावि/२८८/२०२४, दि.३०/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. ३५-२/२०२३-२४ अन्वये पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या क गटातील वाहनांच्या दुरुस्तीकामी एजन्सि निश्चित करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करणेत आली होती. वरील प्रमाणे निविदांसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. नेहा ऑटोमोटिव्हा पुणे या ठेकेदाराच्या नि.नो.क्र. ३५-२/२०२३-२४ मधील कामासाठी निविदा र.रु.१,९१,१२,१२७/- पेक्षा ९.९९% कमी र.रु.१,७२,०२,८२६/- या दराने निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्टया वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.आयुक्त यांनी दिनांक:२३/०७/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून नि.नो.क्र. ३५-२/२०२३-२४ करीताची मुळ निविदा र.रु.१,९१,१२,१२७/- पेक्षा ९.९९% कमी र.रु.१,७२,०२,८२६/- अधिक नियमानूसार GST या खर्चास मान्यता देणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवाकर (GST) अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८५९** **विषय क्रमांक- ३८५९**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- समाज विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८५९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सविवि/०६/कावि/१३६/२०२४, दि.२३/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत १०वी आणि १२वी च्या मुलींना डिप्लोमा कोर्सेसचे प्रशिक्षण देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८५९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सविवि/०६/कावि/१३६/२०२४, दि.२३/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील १० वी आणि १२ वी च्या मुलींना कौशल्य प्रशिक्षण देऊन, त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांचेमार्फत महत्वकांक्षी उपक्रम राबविणेत आलेला आहे. यामध्ये अद्यापपर्यंत सन २०२३-२४ मध्ये ५४ मुलींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.त्या अनुषंगाने मा.आयुक्त सो, व मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटीकडील प्रतिनिधी यांच्या समवेत दिनांक ०३/०३/२०२४ रोजी झालेल्या बैठकीनुसार मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांनी दि.८/०३/२०२४ रोजी मेल द्वारे इयत्ता १० वी उतीर्ण असलेल्या ३० मुलींकरीता Diploma in Manufacturing Excellence व १२ वी विज्ञान उतीर्ण असलेल्या ३० मुलींकरीता Diploma in Manufacturing Automation या दोन कोर्सेस करीता २ वर्षाचा निवासी अभ्यासक्रमासाठी कोर्स सुरु करणेसाठी परवानगी मागितली आहे. मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांनी उक्त कोर्ससाठी खालील प्रमाणे अटी शर्तीसह प्रस्ताव सादर केलेला आहे. <u>प्रस्तावित कोर्स तक्ता</u> |

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नाव | शैक्षणिक अर्हता | कालावधी | रोजगाराच्या संधी | प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Diploma in Manufacturing Excellence | $10^{th}$ Pass girls | 2 yrs (24 Months) | Automobile, Manufacturing, Auto-comp Trainee Engineer, Assembly lines, QC, Machine Operator | 4,60,000/- |
| 2 | Diplomain Manufacturing Automation | $12^{th}$ Science with Math Pass girls | 2 yrs (24 Months) | Automobile, Auto-comp, Engineering, Manufacturing, Operators and Engineers in QC, SCM, Assembly Lines. | 4,60,000/- |

Batch size 30 each for program Diploma in Manufacturing Excellence & Batch size 30 each for program Diploma in Manufacturing Automation
Mobilization and selection starts - April of every year

Selection announcement - July of every year with Training starting in August Diploma programs are residential programs and include the following costs –
1. Training and evaluation by the university
2. Laboratory use and consumables
3. Residential at university's off campus facility
4. Canteen and mess facilities of the university
5. Transportation between hostel and campus
6. Training arrangement with partner companies

Costs do NOT include the following -
1. Refundable deposit at Rs. 15,000 per student per year
2. Medical insurance of Rs. 8,000 per student per year
3. Refundable Medical Contingency fund of Rs. 1,00,000 per batch per year
4. Costs to mobilize candidates including travel, promotional activities and joint selection - at actual

* प्रशिक्षणाचे ठिकाण - तसेच सदरचे प्रशिक्षण २ वर्षाचा रहिवासी अभ्यासक्रमाचा कोर्स राबवयाचे असल्यास, मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी किवळे हे ठिकाण सूचविण्यात आले आहे.

* प्रशिक्षणाचे शुल्काबाबत - सदर प्रशिक्षण शुल्क हे प्रशिक्षण साहित्य सह दिलेले आहेत. प्रशिक्षण शुल्कावर अतिरिक्त कर लागू राहील.

* प्रशिक्षणार्थींची संख्या - इयत्ता १०वी उतीर्ण असलेल्या ३० मुली Diploma in Manufacturing Excellence व १२ वी विज्ञान उतीर्ण असलेल्या ३० मुली Diploma in Manufacturing Automation असणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील मुलींकरीता डिप्लोमा कोर्सेस मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांचेमार्फत राबवायचे झालेस, पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांचेकडील डिप्लोमा कोर्सेस राबवायचे झालेस Dilpoma in Manufacturing Excellence या कोर्सकरीता ३० मुलींकरीता प्रथम वर्षाकरीता र.रु.२,३०,०००/- (प्रत्येकी) याप्रमाणे र.रु.६९,००,०००/- व Diploma in Manufacturing Automation या कोर्सकरीता ३० मुलींकरीता प्रथम वर्षाकरीता र.रु.२,३०,०००/- (प्रत्येकी) याप्रमाणे र.रु.६९,००,०००/- असे एकुण र.रु.१,३८,००,०००/- तसेच २ वर्षाकरीता र.रु.२,७६,००,०००/- तरतूद आवश्यक आहे.

२. मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांचेकडील प्रस्तावानुसार संबंधित सर्व प्रशिक्षण शुल्काची रक्कम + अतिरिक्त कर इ.रक्कम ही लाभार्थींचा कोर्स सुरू होणेपूर्वी संस्थेस आगाऊ स्वरूपात अदा करणेकामी कळविले आहे. परंतू, प्रशिक्षणाचे प्रथम वर्षाच्या एकुण फी चे ७५% व द्वितीय वर्ष पुर्ण झालेनंतर एकुण कोर्स फी चे ७५% व विद्यार्थ्यांना रोजगार दिलेनंतर प्रत्येकी वर्षाचे उर्वरीत २५% रक्कम लाभार्थीनुसार अदा करणेस आवश्यक आहे.

३. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील मुलींना कौशल्य प्रशिक्षण शुल्काची / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील (सन २०२४-२०२६) महिला व बालकल्याण योजनेच्या पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नोकरी करण्या-या / शिक्षण घेणा-या महिला वस्तीगृहामध्ये इतरत्र रहात असल्यास अर्थसहाय्य

| | |
|---|---|
| | या उपलेखाशिर्षामधून करणेस व सदर उपलेखाशिर्षावर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात र.रू.१,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली असून, त्यामधील सद्यस्थितीत र.रू.१,००,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध असून सदरचा खर्च त्यामधून करणेस आवश्यक आहे.<br>४. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील युवतींना Dilpoma in Manufacturing Excellence व Diploma in Manufacturing Automation या रोजगाराभिमुख डिप्लोमा कोर्सेसचे प्रशिक्षण देणेकामी मे.सिम्बॉयसिस स्कील्स अँण्ड प्रोफेशनल युनिर्व्हसिटी यांची नियुक्ती निवेदन न मागविता थेट पध्दतीने करणे आवश्यक आहे.<br>उपरोक्त नमूद केले प्रमाणे व प्रपत्र अ नुसार सदर विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६०** **विषय क्रमांक- ३८६०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/४/२३५/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरासाठी २४x७ पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात पाणीपुरवठा विभागाकडील विशेष योजना निधीमध्ये समाविष्ट करुन तरतुदीत वाढ-घट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/४/२३५/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, केंद्रशासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत र.रु.१४३.१७ कोटी किंमतीच्या पिंपरी चिंचवड शहरातील ४०% भागात २४×७ पाणीपुरवठा योजना राबविणे व ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती (O&M) करणे या प्रकल्पास केंद्र शासनाकडून दि.१७/१२/२०१३ रोजी प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली. या प्रकल्पाच्या निविदा पूर्व प्रक्रिया (Pre tender Activities) व निविदा नंतरच्या उपक्रमासाठी, डी.आर.ए. कन्सल्टंट लि. नागपूर यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultancy) म्हणून नेमणूक करणेत आली. दि.०३/०२/२०२३ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मा.आयुक्त यांनी मे.विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची नवीन SIP-VIII अतिरिक्त र.रु.२३.०८ कोटी मंजूर केली आहे व कामाची मुदतवाढ दि.३०/०९/२०२४ पर्यंत वाढवली आहे. त्यानुषंगाने मा.प्रशासक ठराव क्र.३५९९, दि.०७/०६/२०२४ अन्वये मे.डी.आर.ए. कन्सल्टंट्स यांना दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणे व वाढीव खर्च र.रु.९७,०२,०००/- यास स्थायी समितीची मान्यता मिळालेली आहे. पाणीपुरवठा विभागाचे सन २०२४-२०२५ चे अर्थसंकल्पामध्ये सदरचे काम विशेष योजना निधीमध्ये समाविष्ट करुन तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे विभागांतर्गत वर्गीकरण करुन वाढ/घट करणे अत्यंत आवश्यक आहे. |

| अ. क्र. | कामाचे नाव | पृष्ठ/ अनु.क्र. | सन २०२४-२५ चा मूळ अंदाज | वाढ | घट | सन २०२४-२५ ची सुधारीत / (शिल्लक तरतूद) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड शहरासाठी २४x७ पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | पृ..क्र. / बजेट कोड- २२२३० ७५२१ | ०.०० | ९७,०२,०००/- | ०.०० | ९७,०२,०००/- |
| २ | पॅकेज-१ डुडुळगाव, चोवीसावाडी , वडमुखवाडी व च-होली या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे ,८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ शुध्द पाण्याची टाकी व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | पृ./अ. क्र. ४६२/१८ / बजेट कोड- २२२३० ७५५७ | १०,००,००,०००/- | ०.०० | ९७,०२,०००/- | ९,०२,९८,०००/- |
| | एकूण | | १०,००,००,०००/- | ९७,०२,०००/- | ९७,०२,०००/- | १०,००,००,०००/- |

सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामधील विशेष योजना निधीमध्ये सदरचे काम समाविष्ट करुन तरतुदीमध्ये उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद प्रमाणे विभागांतर्गत वर्गीकरण करुन वाढ/घट करून त्याकरीता र.रु.९७,०२,०००/- ची तरतूद ठेवणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६१** **विषय क्रमांक- ३८६१**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/१२०/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील ६०% भागात अमृत योजनेंतर्गत पुरेशा दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच नजिकच्या भविष्यात विकसित होणा-या भागासाठी पाणीपुरवठा योजना राबविणे व त्यासाठी निविदापूर्व (Pre Tendering) व निविदा पश्चात (Post tendering) कामासाठी कन्सल्टंट / पीएमसी यांची नेमणूक करणे या कामाचे मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |

**ठराव क्र.३८६१ दिनांक - ०६/०८/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/कावि/१२०/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, "पिंपरी चिंचवड शहरातील ६०% भागात अमृत योजनेंतर्गत पुरेशा दाबाने पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच नजिकच्या भविष्यात विकसित होणा-या भागासाठी पाणीपुरवठा योजना राबविणे व त्यासाठी निविदापूर्व (Pre Tendering) व निविदा पश्चात (Post tendering) कामासाठी कन्सल्टंट / पीएमसी यांची नेमणूक करणे" या कामाचा आदेश तांत्रिक सल्लागार मे.डी.आर.ए. कन्सल्टंट लि. यांना दि.०७/०३/२०१९ रोजी देणेत आला आहे. सदर कामाची निविदा पूर्व कार्यवाहीसाठी ३ महिने मुदत आणि निविदा पश्चात कार्यवाहीसाठी २४ महिने मुदत देणेत आली आहे. सल्लागाराची कामाची मुदत हि दि.३०/०६/२०२४ रोजी संपत आहे. पिंपरी चिंचवड शहराची वेगाने वाढणारी लोकसंख्या तसेच पिंपरी चिंचवड शहराची भविष्यात होणारी वाढ व प्राप्त परिस्थितीचा विचार करता रावेत, किवळे, मामुर्डी, च-होली, वडमुखवाडी, डुडुळगाव आणि चिखली इत्यादी परिसरांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने पाणीपुरवठा विभागाकडील काही प्रमाणात अतिरिक्त कामे करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर भागासाठी नव्याने नियोजन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिध्द करणे, डिझाईननुसार नवीन पाईपलाईन टाकणे, नवीन जलकुंभ उभारणे इत्यादी स्वरुपाची कामे करणेत येत आहेत. या सर्व कामांचे डिझाईन तयार करणे, कामाची गुणवत्ता राखणे, ठेकेदारांच्या बिलांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करणे, काम चालू असताना देखरेख करणे इत्यादी स्वरुपाच्या कामांसाठी तांत्रिक सल्लागार मे.डी.आर.ए. कन्सल्टंट यांची नेमणूक झाली असून त्यानुसार ते काम करत आहेत. तांत्रिक सल्लागार यांचेकडे निविदा पूर्व आणि निविदा पश्चात अशा स्वरुपाचे कामकाज आहे. नवीन कामांमध्ये निवासी / बिगर निवासी नळ कनेक्शन बदलणे, नवीन पाईपलाईन टाकणे या व्यतिरिक्त २८ उंच पाण्याच्या टाक्या व ३ संप उभारणे इत्यादी स्वरुपाची कामे आहेत. त्या अनुषंगाने एकूण ४ कामांच्या निविदा प्रसिध्द करणेत आल्या असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | निविदा / कामाची नावे | निविदा क्र. आणि कामाचा आदेश | ठेकेदार | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पॅकेज १- डुडुळगाव, चोवीसावाडी, वडमुखवाडी व च-होली या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ शुध्द पाण्याची टाकी व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | ११/४-१/२०१९-२०, दि.२८/१२/२०२० | मे. गुडविल कन्स्ट्रक्शन | १) २४ महीने + १२ महिने मुदतवाढ (दि.२७/१२/२०२३ पर्यंत)<br>२) १२ महिने मुदतवाढ (दि.२७/१२/२०२४ पर्यंत) | ९४.५६% काम पूर्ण |
| २ | पॅकेज २ - चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे. | १३/२-१/२०२०-२१ दि.०४/०६/२०२१ | मे.अरिहंत कन्सट्रक्शन | १) ०६ महिने मुदतवाढ (दि.१३/१२/२०२४ पर्यंत)<br>२) ०६ महीने मुदतवाढ (दि.१२/०६/२०२४ पर्यंत) | ९४.४५% काम पूर्ण |
| ३ | पॅकेज ३- वाकड, थेरगाव, से.७/१० व भोसरी या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका टाकणे, ९ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, १ पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | १३/२-२/२०२०-२१ दि.०१/०२/२०२२ | मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. | १) १२ महिने मुदतवाढ (दि.३१/०१/२०२५ पर्यंत) | ६०.०८% काम पूर्ण |
| ४ | पॅकेज ४- किवळे, से.९६, पुनावळे व ताथवडे या ठिकाणी पाण्याची मुख्य नलिका, ८ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे, २ शुध्द पाण्याच्या टाक्या व पंप हाऊस उभारणे व कार्यान्वित करणे. | ११/४-४/२०१९-२० दि.०२/०२/२०२१ | मे. एस. एस. साठे | १) २४ महीने + १२ महिने मुदतवाढ (दि.०१/०२/२०२४ पर्यंत)<br>२) १२ महिने मुदतवाढ (दि.०१/०२/२०२५ पर्यंत) | ७१.१७% काम पूर्ण |

| | |
|---|---|
| | वर नमूद केलेली कामे कंत्राटदारामार्फत प्रगतीपथावर असून त्यास अतिरिक्त / वाढीव कालावधी लागणेची कारणे खालीलप्रमाणे आहेत-<br>· कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळेवेळोवेळी अंमलात आलेले निर्बंध<br>· स्थानिक लोकांचा कामास वेळोवेळी होणारा विरोध<br>· पाण्याच्या टाक्यांसाठी जागा उपलब्ध होणेस होणारे विलंब<br>· अस्थिर बाजारभावांमुळे कंत्राटदाराकडून पाईप मटेरीअल खरेदी करण्यास झालेला उशीर<br>· पाईपलाईन टाकण्यासाठी विविध विभागाकडील आवश्यक परवानग्या मिळण्यास लागणारा उशीर<br><br>सदरील कामे करताना आलेल्या अडीअडचणींमुळे काम पूर्ण करण्यासाठी झालेल्या विलंबामुळे शिल्लक कामे पूर्ण करण्याकरीता मे.गुडविल कन्सट्रक्शन या ठेकेदारास दि.२७/१२/२०२४, मे.अरिहंत कन्सट्रक्शन्स यांना दि.३१/१२/२०२४, मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांना दि.३१/०१/२०२५ व मे.एस.एस.साठे यांस दि.०१/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. एकंदरीत सदर पॅकेजेस ची शिल्लक कामे पूर्ण करणेकरिता एप्रिल-२०२५ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरची ४ कामे साधारणतः एप्रिल-२०२५ अखेर पर्यंत चालू राहणार आहेत. त्यामुळे तांत्रिक सल्लागार यांनी दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली आहे. सदर प्रकल्पांतर्गत २८ पैकी एक पाण्याची टाकी कार्यान्वित होऊन पाणीपुरवठा चालू आहे. ६ पाण्याच्या टाक्यांची RCC कामे पूर्ण झाली असून टेस्टिंग व पेंटिंग ची कामे शिल्लक आहेत. मुख्य जलवाहिन्यांच्या एकूण ६१.१६ किमी पैकी ४६.८ किमी काम पूर्ण झाले असून १४.३६ किमी चे काम प्रगतीपथावर आहे. १०२ किमी च्या वितरण नलीकेच्या कामापैकी ९२ किमी चे काम पूर्ण झाले असून उर्वरित १० किमी चे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सदर पाईपलाईनची hydrotesting, interconnections, commissioning ई. कामे शिल्लक आहेत. वर नमूद केलेली कामे पूर्ण होईपर्यंत सदर प्रकल्पांतर्गत कामावर देखरेख ठेवणे, कामाची गुणवत्ता ठेवणे व बिल अदायगी कामी सल्लागार मे. डी. आर. ए. कन्सल्टंट यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सल्लागारानां कामाचे आदेश दि.०७/०३/२०१९ रोजी देण्यात आलेले आहेत. सदर कामाची निविदा र.रु.४,१३,०६,४५२/- इतकी होती. सदर पॅकेज -१ ते पॅकेज -४ निविदांमधील शिल्लक कामे पूर्ण करणे गरजेचे असून सदरील कामे पूर्ण करण्यासाठी Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसच्या कामांसाठी र.रु.१,९८,९०,०००/- इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे निविदा रक्कमेपेक्षा र.रु.१,९८,९०,०००/- इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून सल्लागाराने १० महिने मुदतवाढीची मागणी केलेली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता, सल्लागाराचे प्रकल्पांतर्गत असलेली कामे आणि सर्विसेस पूर्ण करण्यासाठी होणारा विलंब तसेच यासाठी लागणा-या अधिकच्या कालावधी कामी सल्लागारांनी केलेली मुदतवाढीची मागणी काम पूर्ण होणेचे दृष्टीने सकारात्मक असलेचे निदर्शनास येत आहे. तसेच प्रकल्पांतर्गत चालू असलेली कामे विविध अडचणींमुळे पूर्ण करण्यास होणारा विलंब लक्षात घेता, सुरु असलेली कामे करण्यासाठी मुदतवाढ द्यावी लागेल असे दिसून येत आहे. यास अनुसरून सल्लागाराची Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसचा कालावधी जी वरील कामाशी निगडीत आहे, ची मुदतवाढ दि.३०/०४/२०२५ पर्यंत करणे गरजेचे आहे. तसेच ठेकेदारांचे Final Bill, Project commissioning, Handing Overइ. कामासाठी देखील अधिकचा वेळ लागणार आहे. या पार्श्वभूमीवर सल्लागाराचे कामाची मुदत ही,मूळ टेंडर अटी-शर्तीनुसार |

| | |
|---|---|
| | दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाच्या निविदा अंतर्गत व महानगरपालिकेच्या अंतर्गत चालू असणारी कामे व व्याप लक्षात घेता, Project Management Consultancy (PMC) सर्व्हिसेसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणा-या वाढीव खर्चास (कामाच्या रकमेच्या आदेशापेक्षा अंदाजे र.रु.१,९८,९०,०००/- जादा) खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.<br>१. सल्लागाराचे प्रकल्पांतर्गत असलेली कामे करून घेण्यास, आहे त्या निविदा अटी व शर्ती नुसार दि.३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता मिळणे.<br>२. सल्लागाराचे सर्विसेसच्या कामाच्या निविदा रकमेच्या होणा-या वाढीव खर्चास (कामाच्या रकमेच्या आदेशा पेक्षा अंदाजे र.रु.१,९८,९०,०००/- जादा) यास मान्यता मिळणे.<br>तरी, वरील कामाची मुळ अंदाजपत्रकीय र.रु.४.१३ कोटी इतकी असून वाढीव र.रु.१.९९ कोटी सह एकूण र.रु. ६.१२ कोटी इतकी होत आहे. त्यामुळे सदर कामे निविदा अटी व शर्तीनुसार कराव्या लागणा-या खर्चास तसेच सुधारित तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता घेणेसाठी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६२** **विषय क्रमांक- ३८६२**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य ह क्षेत्रिय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/ह क्षे/कावि/६३९/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ह क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाचे सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात नव्याने कामाचे नाव समाविष्ट करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/ह क्षे/कावि/६३९/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, मनपाचे ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२० कासारवाडी येथे मनपाची छत्रपती शाहू महाराज शाळेची नविन शाळा इमारत बांधणेचे काम सुरू आहे. सदर परिसरात यापूर्वीची जुनी शाळा इमारत असून त्यालगत छत्रपती शिवाजी महाराज यांचा महापालिका स्थापना पूर्वीचा अर्धाकृती पुतळा आहे. नविन शाळा इमारत बांधून पूर्ण झालेनंतर जुनी शाळा इमारत पाडून त्याजागी शाळेचे मैदान तयार करण्याचे प्रयोजन आहे. त्यामुळे जुन्या इमारती शेजारील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा स्थलांतरित करणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे कासारवाडी येथील मनपाची छत्रपती शाहू महाराज शाळेच्या परिसरातील जुना पुतळा काढून त्याच परिसरात नव्याने बांधणेत येत असलेल्या शाळा इमारतीच्या शेजारी राजमाता जिजाऊ बाल शिवाजी यांना शिकवितांनाचा पूर्णाकृती पुतळा बसविणेकरिता मा. आयुक्त यांनी दि.०९/०१/२०२४ रोजीच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. तसेच त्याच शाळा परिसरातील नविन शाळा इमारत बांधणेचे काम पूर्णत्वास आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळा बांधकाम पूर्ण झालेनंतर मनपा बांधकाम परवानगी नियमावलीनुसार जुनी शाळा इमारत पाडून शाळेच्या आवश्यकतेनुसार नविन मैदान विकसित करणे गरजेचे आहे. यानुसार पाहणी केलेली असता सद्यस्थितीतील मैदान हे |

शाळेतील विदयार्थ्यांना कमी पडत असल्याचे दिसून आले. त्यामुळे विदयार्थ्यांच्या शारिरिक व्यायामाकरिता व कलागुणांना वाव देणेकरिता सदर मैदान विकसित करणे आवश्यक वाटते. त्यामुळे जुनी शाळा इमारत पाडून त्याजागी नविन मैदान विकसित करणेचे प्रयोजन आहे. व नविन शाळा इमारतीमध्ये आवश्यक ती फर्निचर विषयक सुविधा देणे गरजेचे आहे. तरी सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील 'विशेष योजना' या लेखाशिर्षावर "प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व अनुषंगिक कामे करणे" व "प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची प्राथमिक व माध्यमिक शाळा परिसरात मैदान विकसित करणे व फर्निचर विषयक कामे करणे" नावाचा अंदाजपत्रकात नव्याने समावेश करणे आवश्यक आहे.

| अ क्र | कामाचे नाव | प्रभाग क्र | अंदाज पत्रकीय र.रू. | सन २०२४-२५ चे | | लेखा शिर्ष | बजेट कोड | सन २०२४-२५ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२४-२५ साठी एकूण मुळ तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पान क्र. | अ.क्र | | | | | | | |
| १ | प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | २० | ५०००००००० | अंदाज पत्रकात नाव नाही | | | | ० | १०००००० | ० | १०००००० | |
| २ | प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची प्राथमिक व माध्यमिक शाळा परिसरात मैदान विकसित करणे व शाळा इमारतीमध्ये फर्निचर विषयक कामे करणे | २० | १००००००००० | अंदाज पत्रकात नाव नाही | | | | ० | १०००००० | ० | १०००००० | |
| ३ | प्रभाग क्र. २० एम.आय.डी.सी. येथील पोस्ट ऑफीस समोरील रस्ता नव्याने विकसीत करणे. | २० | ५०००००००० | ३२ | १४१ | विशेष योजना | कोड -222300480 (08-पेव्हेमेंट मॅनेजमेट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे) | ५०००००० | ० | २०००००० | ३०००००० | |
| **एकूण** | | | | | | | | ५०००००० | २०००००० | २०००००० | ५०००००० | |

तरी वरीलप्रमाणे सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात समावेश करून सदर कामावर तरतूद वर्गीकरणास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६३** **विषय क्रमांक- ३८६३**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- नगररचना व विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१०/१६०/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी या गावाच्या मंजूर विकास योजनेमध्ये नगर रचना योजना राबविणेकरीता मे.एच.सि.पी. डीझाईन, प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट प्रा.लि. कंपनीस सुधारीत दरासह मुदतवाढ देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१०/१६०/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नगर रचना योजना बो-हाडेवाडी तयार करणेकरीता निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदर निविदेनुसार मे.एच.सि.पी. डीझाईन, प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट प्रा.लि. यांची नेमणूक सल्लागार म्हणून महानगरपालिकेमार्फत करणेत आलेली आहे. सदर कामाची निविदेस र.रू.१७५००/- प्रति हेक्टर दराने (GST वगळून) मा.स्थायी समिती ठराव क्र.३२४८, दि.०९/१०/२०१८ अन्वये मान्यता मिळाली आहे.सदरहू योजना एक वर्षात शासनास सादर करावयाची होती. परंतू दरम्यान कोव्हीड-१९ महामारीमुळे, मोजणी न झालेमुळे तसेच या योजने सोबत चालू असलेल्या उर्वरीत नगर रचना योजना निळ्या पुररेषेमुळे रद्द झाल्याने बो-हाडेवाडी योजना विहित मुदतीत प्रसिद्ध न झाल्याने व्यपगत झालेली होती. त्यावर सदरहू योजना पुनःश्च पुनर्जिवीत करणेकरीता मा.प्रशासक यांचेकडील मंजूर स्थायी समिती ठराव क्र.३०२२, दि.०६/०२/२०२४ व मा.प्रशासक यांचेकडील मंजूर महापालिका सभा ठराव क्र.५४२, दि.०९/०२/२०२४ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. राजपत्रामध्ये व दि.११/०२/२०२४ रोजीचे वृत्तपत्रात उद्घोषणा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. निविदाधारक मे.एच.सी.पी. कंपनीने पुनःश्च काम करणेकरीता मुळ दरापेक्षा १०% जास्त सुधारीत दर कळविलेला होता. त्यास अनुसरून मुख्य लेखापरिक्षक यांचे अभिप्रायान्वये प्रस्ताव पाठविला असता त्यांनी अहवाल यामध्ये "सदरचे काम चालु असलेने व काम पूर्ण न होणेची कारणे विभागाने नमुद केली असल्याने निविदा अटी / शर्तीनुसार कामास मुदतवाढ मंजुर करुन काम पूर्ण करणेत यावे. संस्थेने मागणी केलेला दर हा सदर कामासाठी सदयास्थितीतील बाजारभावानुसार असल्याबाबतची विभागाने खात्री करुन कार्यवाही करावी. याबाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेवून पूढील योग्य ती कार्यवाही करावी" असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तरी वरील मुद्यास अनुसरून अहवाल सादर करणेत येतो की, सदर प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्तांनी मान्यता घेतेवेळी PMRDA, MMRDA,NMC येथील या प्रकारच्या कामांसाठीचे दरांची तुलना निवीदेवेळी करणेत आलेली होती. त्यावेळी विचारात घेतलेले दर व सध्या HCP कंपनीने मागणी केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे, |

| अ. क्र. | Item name | PMRDA प्रति हेक्टर दर (२०१७) | महानगरपालिका प्रति हेक्टर दर (२०१८) | तुलनात्मक वार्षिक दरवाढ PMRDA & PCMC (in % ) | वार्षिक दरवाढीनुसार आज रोजीचा प्रति हेक्टर दर (२०१८ ते २०२४ -६ वर्ष) {d+[(d x e)x 6]} | कंपनीने कळविलेनुसार प्रति हेक्टर दर |
|---|---|---|---|---|---|---|
| a | b | c | d | e | f | g |
| 1 | For Greenfield Parcel Wherein open/undeveloped land is & gt. 50% of the land parcel | Rs.16,000/- | Rs.17,500/- | 9.375 % | Rs.27,343.75 | Rs.22,335/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | For Semi-Urban Parcel Wherein open/undeveloped land is & it. 50% but & gt. 30% of the land parcel | | Rs.19,000/- | 9.375 % | Rs. 29,687.5 | Rs.24,249/- |
| 3 | For Urban Parcel Wherein open/undeveloped land is < 30% of the land parcel | | Rs.21,500/- | 9.375 % | Rs.33,593.75 | Rs.27,440/- |

वरील तुलनात्मक तक्त्याचा विचार करता जर PMRDA च्या २०१७ व महानगरपालिकेच्या २०१८ च्या दराच्या तुलनेने वार्षिक वाढ ९.३७५% आहे. त्यानुसार २०२४ पर्यंत र.रू.२७,३४३.७५ प्रति हेक्टर दर अपेक्षित आहे. परंतू कंपनीने र.रू.२२,३३५/- इतकी दरवाढ मागविलेली आहे, जी आज रोजीच्या र.रू.२७,३४३.७५ प्रति हेक्टर दरापेक्षा कमी असून वाजवी आहे.मे.एच.सि.पी. डीझाईन, प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट प्रा.लि. कंपनीस पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नगररचना योजना - बो-हाडेवाडी (TPScheme) राबविणेचे कामास एक वर्षाची मुदतवाढीसह सुधारीत र.रू.२२,३३५/- इतकी दरवाढ देणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६४** **विषय क्रमांक- ३८६४**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- नगररचना व विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/२५३/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, मौजे मोशी मधिल पुणे नाशिक रस्ता ते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा ९०.०० मी. रुंद रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/२५३/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, "मौजे मोशी गट नं.४५२ (जुना गट नं.४५०) गट नं.४५९ (जुना गट नं.४५७), गट नं.४४१ (जुना गट नं.४४२), गट नं.६४६ (जुना गट नं.६४९ सरकारी गायराण), गट नं.४४४ (जुना गट नं.४४५), गट नं.४४३ (जुना गट नं.४४४) मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुणे-नाशिक रस्ता ते वडमुखवाडी शिवेपर्यंतचा मंजूर विकास योजनेतील सुमारे १६५०.०० चौ.मी. लांबीचा ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आला आहे. शहराचे वाढती लोकसंख्येचा विचार करता वाहतूकीच्या दळणवळणाच्या दृष्टीने सदर रस्ता विकसित करणे अंत्यत आवश्यक आहे. सदर रस्त्याने बाधित काही जागा टिडीआर/एफएसआय चे बदल्यात मनपाचे ताब्यात आलेल्या आहेत. तथापि उर्वरीत जागा ताब्यात घेणेकामी सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणे आवश्यक असून (त्यामध्ये भूसंपादन कार्यालय कळवतील ती नुकसान भरपाई रक्कम) त्यासाठी आवश्यक ते |

| | |
|---|---|
| | सर्वेक्षण, मोजणी करणे इ. अनुषंगिक मंजूरीसह येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६५** **विषय क्रमांक- ३८६५**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- क्रीडा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/३४९/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्रेक्षागृह/नाटयगृहातील अनामत, भाडे व इतर भाडे/दर आकारणीस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/३४९/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत येणा-या प्रेक्षागृह/नाट्यगृह येथे नाटक व विविध स्वरूपाचे सांस्कृतिक व तसेच इतर कार्यक्रम होत असतात. सद्यस्थितीत महानगरपालिकेची एकुण 05 प्रेक्षागृहे/ नाटयगृह सुरु आहेत. टाऊन हॉल,चिखली हे नाटयगृह नव्याने उभारण्यात आले आहे. यापैकी १) प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चिंचवड, २) कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी, ३) आचार्य अत्रे रंगमंदीर, संत तुकारामनगर, पिंपरी, ४) नटसम्राट निळु फुले रंगमंदीर पिंपळे गुरव या प्रेक्षागृह/नाट्यगृह यांची भाडे / अनामत याबाबत दर निश्चीती करण्यात आली आहे. परंतु १) ग.दी.माडगुळकर नाटयगृह, आकुर्डी प्राधिकरण, व २)टाऊन हॉल नाटयगृह,चिखली यांचे भाडे, अनामत व इतर भाडे इ. दर निश्चीती करणे आवश्यक आहे. त्यामुळे नटसम्राट निळु फुले रंगमंदीर, पिंपळे गुरव येथील मंजूर असलेले भाडे/ अनामत/ इतर इ. दरांप्रमाणे १) ग.दी.माडगुळकर नाटयगृह, आकुर्डी प्राधिकरण, व २) टाऊन हॉल नाटयगृह,चिखली यांचे भाडे, अनामत व इतर भाडे इ. दर सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “अ” व “ब” नुसार निश्चीत करुन लागु करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६६** **विषय क्रमांक- ३८६६**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- क्रीडा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सहा.आयुक्त, क्रीडा यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/३५०/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इंडस्ट्रीयल स्पोर्टस असोसिएशन शुटींगबॉल स्पर्धेकरीता सहभागी झालेल्या खेळाडूंना शॉर्ट-टी शर्ट, ट्रॅकसुट, शुज व किटबॅग साहित्य खरेदीबाबत. |
| **ठराव क्र.३८६६ दिनांक -** | मा.सहा.आयुक्त, क्रीडा यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/०९/कावि/३५०/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इंडस्ट्रीयल स्पोर्टस असोसिएशन शुटींगबॉल |

| | |
|---|---|
| ०६/०८/२०२४ | स्पर्धेकरीता सहभागी झालेल्या खेळाडूंना शॉर्ट-टी शर्ट, ट्रॅकसुट, शुज व किटबॅग साहित्य खरेदीकामी निविदा नोटीस क्रमांक GEM /२०२3/B/3549268 अन्वये GEM पोर्टलवर निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. GEM /२०२3/B/354 प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार शॉर्ट-टी शर्ट, ट्रॅकसुट, शुज व किटबॅग साहित्य खरेदीकामी मे.हरिओम स्पोर्टस, नवी सांगवी यांचेकडून १४ किट. खरेदीकामी येणारी एकूण र.रु.१,१२,३५०/- ही अंदाजपत्रकीय रक्कम र.रु.१,१९,१४०/- पेक्षा ५.७ टक्के कमी दराने असल्याने मा. उप आयुक्त, क्रिडा विभाग यांनी दि.३१/०८/२०२३ रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार शॉर्ट-टी शर्ट, ट्रॅकसुट, शुज व किटबॅग साहित्याच्या एकूण १४ किट खरेदीकामी येणा-या एकूण र.रु.१,१२,३५०/- चे खर्चास मान्यता घेणेकामी तसेच सदरचा खर्च क्रीडा विभागाकडील “खेळाडू विद्यार्थ्यांना टी शर्ट, बूट, ट्रॅकसुट साहित्य खरेदी.” या लेखाशिर्षावरुन केलेबाबत मा.प्रशासक यांची अवलोकन केले. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६८** **विषय क्रमांक- ३८६८**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य PMAY प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/PMAYप्र/३४२/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत च-होली येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणे प्रकल्पाच्या ठेकेदाराचे बिलांची अदायगी करणेकामी तरतुद वर्गीकरण करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/PMAYप्र/३४२/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत च-होली येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणेचे प्रकल्प राबविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत सदर प्रकल्पातील एकुण ७ इमारतींपैकी ६ इमारतींचे पात्र लाभार्थ्यांना हस्तांतरण करण्यात आलेले असून उर्वरित एका इमारतीचे हस्तांतरणाची कार्यवाही चालू आहे. सद्यस्थितीत च-होली प्रकल्पाचे जादा बाबींची बिले अदा करणे तसेच प्रकल्पाचे अंतिम बिल ठेकेदारास अदा करणे बाकी आहे. सदर बिले अदा करणेकामी सन २०२४-२५ ची तरतुद अपुरी पडत आहे. त्यामुळे विभागांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत प्रकल्पातील कामांचे सन २०२४-२५ मधील मुळ अंदाजपत्रकातील तरतुद च-होली या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणे आवश्यक आहे. (२०२४-२५ करिता) |

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ. क्र | सन २०२४-२५ चा मुळ अंदाज | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी रावेत येथे निवासी गाळे बांधणे | पंतप्रधान आवास योजना | ६५३ /२ | १ | ४१,००,००,००० | ० | १७,००,००,००० | आकुर्डी व पिंपरी प्रकल्पा करिता र.रु.९ कोटी तरतुद वर्गीकरण केलेनंतर र.रु.४१ कोटी तरतुद उपलब्ध आहे. |
| २ | केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी च-होली येथे निवासी गाळे बांधणे | पंतप्रधान आवास योजना | ६५३ /१ | १ | १०,००,००,००० | १७,००,००,००० | ० | |
| **एकुण रक्कम रुपये** | | | | | **५१,००,००,०००** | **१७,००,००,०००** | **१७,००,००,०००** | |

तरी केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रावेत येथे निवासी गाळे बांधणे प्रकल्पातील एकुण तरतुदीपैकी र.रु.१७,००,००,०००/- च-होली प्रकल्पाचे ठेकेदार मे.मनाज इन्फ्राकन्स्ट्रक्शन लि. यांचे बिले अदा करणेकामी च-होली प्रकल्पाच्या खात्यांवर वर्गीकरण करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८६९** **विषय क्रमांक- ३८६९**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- कायदा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८६९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कास/६/कावि/३९७/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, आकुर्डी न्यायालयातील मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन २०२३ - २०२४ चे वेतन व भत्ते रक्क अदा करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८६९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कास/६/कावि/३९७/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठीचे आकुर्डी येथील मा. न्यायालयामधील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन – २०२३-२०२४ चे वेतन व भत्ते रक्कम रुपये १,६५,४५,६३६/- (अक्षरी र.रु.एक कोटी, पासष्ट लाख पंचेचाळीस हजार सहाशे छत्तीस फक्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीद्वारे अदा करणेस मान्यता देणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र. सीआरसी २८८९/१४६६/(२३२/९८)-अकरा दि.२ फेब्रुवारी २००२ नुसार दि.०४/०२/२००२ अन्वये न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी) यांचे न्यायालय कार्यरत झालेले आहे. सदर शासन निर्णयाप्रमाणे या न्यायालयासाठी येणारा एकूण खर्च पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून मागणी करुन चलनाद्वारे विहित लेखाशिर्षाखाली जमा करणेबाबत नमुद केले आहे. उक्त शासन निर्णयानुसार |

| | |
|---|---|
| | आकुर्डी न्यायालयासाठी खालील प्रमाणे पदे निर्माण केलेली आहेत.<br><table><tr><th>अ.क्र</th><th>न्यायालयातील कर्मचा-यांचे पदनाम</th><th>पद संख्या</th></tr><tr><td>१</td><td>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग</td><td>१</td></tr><tr><td>२</td><td>सहा.अधिक्षक</td><td>१</td></tr><tr><td>३</td><td>वरिष्ठ लिपीक</td><td>३</td></tr><tr><td>४</td><td>कनिष्ठ लिपीक</td><td>५</td></tr><tr><td>५</td><td>लघुलेखक( नि.श्रै )</td><td>१</td></tr><tr><td>६</td><td>बेलिफ</td><td>३</td></tr><tr><td>७</td><td>शिपाई</td><td>२</td></tr><tr><td>८</td><td>सफाई कामगार</td><td>१</td></tr><tr><td></td><td>एकूण</td><td>१७</td></tr></table>उक्त न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे वार्षिक वेतनावर होणा-या खर्चाचा तपशील प्रतिवर्षी महानगरपालिकेस कळविणेत येतो. त्यानुसार महानगरपालिकेकडून वेतनावर झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करून त्याची वार्षिक रक्कम मे.जिल्हा न्यायाधिश, पुणे-५ यांचे मागणी प्रमाणे अदा केली जाते. यापुर्वी सन २००२ पासून ते ३१ मार्च २०२३ अखेरचा आस्थापना खर्च अदा करणेत आलेला आहे. मा. जिल्हा न्यायालय पुणे.५. यांनी पत्र क्र.C-6/PCMC/5389/2023 दिनांक 02/08/2023 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी येथील न्यायालयातील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन-२०२३-२०२४ चे वेतन व भत्ते एक महिन्याची एकूण र.रू.१३,७८,८०३/- व बारा महिन्यांची र.रू.१३,७८,८०३ X १२ = र.रु.१,६५,४५,६३६/- (अक्षरी र.रु.एक कोटी पासष्ट लाख पंचेचाळीस हजार सहाशे छत्तीस फक्त) चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीद्वारे अदा करणेकामी कळविले असून सदरची रक्कम अदा करणे आवश्यक आहे. शासनाने ज्यावेळी महानगरपालिकेच्या न्यायालयास व पदनिर्मितीस व आस्थापना खर्चास मान्यता दिली तेव्हापासूनचे प्रत्येक वर्षी कायदा विभागाचे अंदाजपत्रकामध्ये ‘महानगरपालिका न्यायालय आस्थापना खर्चाची प्रतिपुर्ती’ या लेखाशिर्षावर तरतुद करणेत येऊन त्यानुसार अदायगी करणेत येत आहे. सन २०२३-२०२४ या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये ‘मनपा न्यायालय आस्थापना खर्च प्रतिपूर्तीबाबत’ या लेखाशिर्षावर र.रु.१,८०,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २६(६) मधील नियम ४२२ नुसार महानगरपालिकेसाठीचे न्यायालयाचे न्यायाधिश व तदनुषंगीक कर्मचारी वर्ग शासनाकडून नियुक्त करून त्यांचा होणारा आस्थापना खर्च (वेतन + सर्व भत्ते) महानगरपालिकेने प्रतिपुर्तीद्वारे अदा करावा अशी स्पष्ट तरतुद आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी आकुर्डी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन-२०२३-२०२४ चे वेतन व भत्ते र.रू.१३,७८,८०३/- व बारा महिन्यांची र.रू.१३,७८,८०३ X १२ = र.रु.१,६५,४५,६३६/- (अक्षरी र.रु.एक कोटी पासष्ट लाख पंचेचाळीस हजार सहाशे छत्तीस फक्त) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून प्रतिपुर्तीद्वारे मा. जिल्हा न्यायाधिश पुणे- ५ यांना अदा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७०** **विषय क्रमांक- ३८७०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पाणीपुरवठा**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/५०५/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आंद्रा धरणातून पाणीपुरवठा करणे या कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांची नेमणूक करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/८/कावि/५०५/२०२४, दि.०२/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील RFP नोटीस क्रमांक १६/२०२३-२४ अन्वये 'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आंद्रा धरणातून पाणीपुरवठा करणे या कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांची नेमणूक करणेकामी QCBS पध्दतीने Mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर RFP प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार 4 प्रस्ताव प्राप्त झालेले होते. वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावापैकी QCBS पध्दतीने मे.डी.आर.ए. कन्सल्टंट्स लि. यांची र.रु.६,००,००,०००/- इतक्या दराची निविदा प्राप्त झाली आहे. सदर आरएफपी वाजवी दराची असल्याने तसेच मे.डी.आर.ए. कन्सल्टंट्स लि. सदर काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.०२/०८/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. मे.डी.आर.ए.कन्सल्टंट्स लि. यांचेबरोबर करारनामा करुन काम करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७१** **विषय क्रमांक- ३८७१**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०५/कावि/३४०/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, मनपाच्या रावेत स.नं.९६ व पुनावळे येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे दुरूस्ती विषयक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०५/कावि/३४०/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.61-03/2023-24 अन्वये मनपाच्या रावेत स.नं.९६ व पुनावळे येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे दुरूस्ती विषयक कामे करणेकामी (२३-२४ साठी) वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरीलप्रमाणे निविदा नोटीस क्र.61-03/2023-24 साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. फ्लोमॅक इंजिनिअरींग कोर्पोरेशन या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या निविदा र.रु.29,00,000/- पेक्षा सुधारीत निविदा दर 18.90% कमी दराने आलेली निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. अति.आयुक्त सो. यांनी दि.01/08/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.23,51,900/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट |

| | |
|---|---|
| | कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७२** **विषय क्रमांक- ३८७२**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०५/कावि/३४१/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, मनपाच्या काळाखडक वाकड, काळाखडक बुस्टर, रहाटणी बुस्टर व रहाटणी स.नं.२० येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे दुरूस्ती विषयक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), विद्युत मुख्य यांचेकडील पत्र क्र.विमुका/०५/कावि/३४१/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.61-06/2023-24 अन्वये मनपाच्या काळाखडक वाकड, काळाखडक बुस्टर, रहाटणी बुस्टर व रहाटणी स.नं.२० येथील शुद्ध पाणीपुरवठा करणा-या पंपहाऊसचे दुरूस्तीविषयक कामे करणेकामी (२३-२४ साठी) वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरीलप्रमाणे निविदा नोटीस क्र.61-06/2023-24 साठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. फ्लोमॅक इंजिनिअरींग कोर्पोरेशन या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या निविदा र.रु.29,00,000/- पेक्षा सुधारीत निविदा दर 21.60% कमी दराने आलेली निविदा असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. अति.आयुक्त सो. यांनी दि.01/08/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.22,73,600/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७३** **विषय क्रमांक- ३८७३**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), उद्यान/वृक्षसंवर्धन यांचेकडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/२६६/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, मनपाचे ई क्षेत्रिय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७३ दिनांक -** | मा.अति.आयुक्त(१), उद्यान/वृक्षसंवर्धन यांचेकडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/२६६/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडील |

| | |
|---|---|
| ०६/०८/२०२४ | निविदा नोटीस क्र. १३/२०२२-२३ विषयांकीत काम/पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा नोटीस क्र.१३/२०२२-२३साठी ०५ निविदा धारक प्राप्त झालेल्या पैकी ०३ निविदाधारक पात्र झाले आहेत. त्यापैकी मे.कृषीतेज डेव्हलपर्स या ठेकेदाराची पी.एच.डी.व अनामत वेळेत न भरल्या मुळे L-२ निविदा धारकांना काम देण्यात येत आहे.तरी L-२ निविदा धारकाने मे.तुळजाभवानी सर्व्हिसेस ठेकेदाराने निविदा रकमेच्या र.रु.६२,९४,३४८/- पेक्षा ०६.९९% कमी दराची निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्टया वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने स्वीकारणेस मान्यता मिळालेली आहे. वरील ठेकदाराकडुन मंजुर दराने र.रु.५८,५४,३७३/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील अटीशर्ती प्रमाणे अधिन राहुन त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७४** **विषय क्रमांक- ३८७४**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- ह क्षेत्रीय**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.हक्षे/आ५/कावि/७३४/२०२४, दि.३१/०७/२०२४ अन्वये, मनपाचे ह क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्वच्छता व देखभाल दुरूस्तीचे कामकाज थेट पध्दतीने देणेत आलेल्या कामाची प्रथम मुदतवाढ देणेबाबत अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.हक्षे/आ५/कावि/७३४/२०२४, दि.३१/०७/२०२४ अन्वये, मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ०३/०१/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे देखभाल व दुरूस्तीचे कामकाजामध्ये सुधारणा होणे करीता नागरीकांना सहभागी करुन घेणे महत्वाचे आहे. या शौचालयामध्ये नागरीकांचा ओनरशिप पार्ट असावा याकरीता साफसफाई चे कामकाजाची जबाबदारी कॉन्ट्रॅक्टरला न देता स्थानिक बचत गट / युथ क्लब यांना देवून सध्याच्या दराने थेट पध्दतीने त्यांना काम देण्यात यावे व त्याचा मोबदला थेट पध्दतीने करारनामा न करता देणेत यावा असे सुचित केलेले आहे. संबंधित विषयांवर गुलाबनगर येथील महिलांशी समूह संघटिका यांनी चर्चा केली असता, ह क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील महिला बचत गट / महिला मंडळ यांनी महानगरपालिकेत दिनांक नोंदणी केली आहे. अशा सर्व महिला या दुर्बल घटकातील असलेल्या महिला बचत गट / महिला मंडळ यांनी महापालिकेच्या दराप्रमाणे/नियमाप्रमाणे आम्ही काम करण्यास तयार आहोत असे पत्रान्वये कळविलेले आहे. त्याअनुषगांने ह क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील सामुदायिक व सार्वजनिक स्वच्छता साफसफाईच्या कामाची निविदा कार्यवाही न करता, थेट पध्दतीने प्रायोगिक तत्वावर ह क्षेत्रीय मार्फत महिला खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे महिला बचत गट / मंडळ यांस प्रायोगीक तत्वावर तात्पुरत्या कालावधी साठी आदेशाच्या दिनांक १/२/२०२४ ते दिनांक ३१/७/२०२४ अखेर ६ महिनेच्या कालावधिकरीता कामकाज करणेस देण्यास आलेले आहे. त्यास मा.स्थायी समिती ठराव २९६०दि. ३०/०१/२०२४ अन्वये कार्योत्तर मान्यता मिळाली आहे. खालील तक्त्यात नमुद |

केलेले महिला बचत गट / मंडळ यांच्या कामाची मुदत दिनांक ३१/७/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. तरी सदरचे शौचालय साफसफाईचे कामकाज करणे अत्यावश्यक असल्याने सदर महिला बचत गटास / मंडळास ६ महिनेच्या मुदतवाढ कालावधीकरीता खालील तक्त्यात नमुद केले प्रमाणे सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्वच्छता व देखभाल दुरूस्तीचे कामासाठी प्रती सिट्स र.रू.११००/- प्रमाणे अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास व सदरचे कामकाजास दिनांक १/८/२०२४ ते ३१/१/२०२५ अखेर कामकाजास मुदतवाढीस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

मुदतवाढ कामकाज दिनांक १/८/२०२४ ते ३१/१/२०२५

| अ क्र | प्र. क्र. | महिला बचत गट / महिला मंडळ नाव | कामकाज देणेत आलेले शौचालय ठिकाण | शौचालय ब्लॉक प्रति सिट्स | प्रति माहे एकुण र.रू | एकुण खर्च | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३० | आचल बचत गट | एल.एस. सोनकांबळे भुयारी मार्गा जवळ सिद्धार्थनगर दापोडी | १ ब्लॉक २२ सिट्स | २४,२००/- | १,४५,२००/- | दि.१/८/२०२४ ते दि.३१/१/२०२५ |
| २ | ३२ | सुकान्यामाई स्वंयसहाय्यता महिला बचत गट | वेताळ महाराज घाट, जुनी सांगवी | १ ब्लॉक ८ सिट्स | ८,८००/- | ५२,८००/- | दि.१/८/२०२४ ते दि.३१/१/२०२५ |
| | | | कुंभारवाडा जुनी सांगवी | १ ब्लॉक ८ सिट्स | ८,८००/- | ५२,८००/- | |
| एकुण रक्कम रूपये | | | | | ४१,८००/- | २,५०,८००/- | |

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७५** **विषय क्रमांक- ३८७५**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.उप आयुक्त, माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/०४/कावि/२४६/२०२३, दि.२८/१२/२०२३ अन्वये, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारप्रबोधन पर्वाचे आयोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.उप आयुक्त, माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/०४/कावि/२४६/२०२३, दि.२८/१२/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि. ०३/०१/२०२४ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रबोधन पर्वामध्ये विविध समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी येणा-या र.रु.३,५५,०००/- च्या खर्चा बाबतच्या दि.२८/१२/२०२३ रोजीच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मान्यता घेण्यात आली आहे. सदर कार्यक्रमासाठी कलाकारांचे र.रु.२,३५,०००/- इतके मानधन ECS द्वारे अदा करणे व चहापान, भोजन, निवास व्यवस्था, कलाकार/ वक्ते / निवेदक इ. चे मानधन, पुस्तक खरेदी, पुतळा भाडे, रांगोळी, मानधन इ. करीता खर्चसाठी र.रु.१,२०,०००/- रोख स्वरुपात अदा करणेस तसेच विचारप्रबोधन पर्वासाठी फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग व एल. ई. डी, फ्लेक्स प्रिंटींगसाठी होणारा खर्च प्रसिद्धी या लेखाशिर्षा मधुन करणेत येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७६** **विषय क्रमांक- ३८७६**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१६९/२०२४, दि.२४/०६/२०२४ अन्वये, भूमिपूजन तसेच लोकार्पण कार्यक्रमांच्या दोन चित्रफीत करण्याबाबतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१६९/२०२४, दि.२४/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या विविध प्रकल्पांचे, विकास कामांचे उद्घाटन, भूमिपूजन तसेच लोकार्पण कार्यक्रम मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते दि.०९/०३/२०२४ रोजी शहरातील विविध ठिकाणी संपन्न झाले आहे. सदर कार्यक्रमामध्ये विविध प्रकल्पांची माहिती देणारी चित्रफीत तयार करण्याबाबतचे कामकाज मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.माजसं/३/कावि/३५/२०२४, दि.०९/०२/२०२४ अन्वये इकडील विभागास सोपविण्यात आले होते. चित्रफीत तयार करण्याबाबतचे दर इकडील विभागाकडे मंजूर नसल्याने व याबाबतची निविदा प्रक्रिया राबविण्यास उपलब्ध कालावधी कमी असल्याने मा.आयुक्त सो यांचे कडील दि.०९/०२/२०२४ रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये सदर कामकाज करण्याचा अनुभव तसेच यापूर्वी मनपाचे उपरोक्त नमूद कामकाज केलेल्या संस्थामार्फत पत्र क्र.माजसं/३/कावि/३६अ/२०२४, दि.०९/०२/२०२४ अन्वये तातडीने या कामासाठीचे दरपत्रक मागविण्यात आलेले होते. यामध्ये M/S.Ifilms Media Production यांचा र.रु.६,२५,०००/- + GST हा लघुत्तम दर प्राप्त झाला होता त्यानुसार कामकाज आदेश क्र.माजसं/३/कावि/ ३६ब/ २०२४, दि.०९/०२/२०२४ अन्वये १२ उद्घाटन प्रकल्पांची एक व ७ भूमिपूजन प्रकल्पांची एक अशा दोन उद्घाटन / प्रकल्पांची माहिती देणा-या चित्रफीत तयार करण्याबाबतचे कामकाज M/S.Ifilms Media Production यांना सोपविण्यात आले होते. त्यानुसार दोन चित्रफीत तयार करण्यात आल्या होत्या. तथापि दि.११/०२/२०२४ रोजी संपन्न होणारा कार्यक्रम संपन्न झाला नाही व उपरोक्त नमूद कार्यक्रम दि.०९/०३/२०२४ रोजी संपन्न झाला व सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी १२ उद्घाटन प्रकल्पांची एक व ७ भूमिपूजन प्रकल्पांची एक अशा दोन तयार केलेल्या चित्रफीतींचे एकत्रित सादरीकरण मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे समक्ष करण्यात आले होते. तरी उपरोक्त नमूद प्रमाणे चित्रफित तयार करण्याकामी आलेल्या खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७७** **विषय क्रमांक- ३८७७**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१७०/२०२४, दि.२४/०६/२०२४ अन्वये, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने Sveep कार्यक्रम/ उपक्रम राबविणेबाबतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(३), माहिती व जनसंपर्क यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१७०/२०२४, दि.२४/०६/२०२४ अन्वये, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने महापालिका कार्यक्षेत्रातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आदेश क्र.निवडणूक/१/कावि/३२७/ २०२४, दि.१२/०४/२०२४ अन्वये Sveep विषयक कामकाज करण्यासाठी उप आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांचे कडे मोठ्या प्रमाणात मतदान करावे यासाठी विविध नविन व नाविन्यपूर्ण उपक्रम महापालिके अंतर्गत २०५ -चिंचवड, २०६-पिंपरी व २०७-भोसरी या विधानसभा मतदारसंघात राबविण्याचे कामकाज सोपविण्यात आलेले होते. उपरोक्त नमूद आदेशान्वये कार्यवाही करणेस व येणा-या खर्चास मा.आयुक्त.सो यांची दि.१५/०४/२०२४ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता घेऊन कोटेशन पद्धतीने दरपत्रके मागवून त्याद्वारे लघुत्तम दर प्राप्त झालेल्या संस्था तसेच पथनाट्य सादरीकरणासाठी शासन यादीवर असलेल्या संस्थेला लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कामकाज करणेबाबतचे कामकाज आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. त्यानुसार रेडिओ जिंगल्स द्वारे मतदान जनजागृती, पथनाट्य तसेच जुनियर्स आर्टिस्ट द्वारे मतदान जनजागृती, वर्तमान पत्र जाहिरातीद्वारे मतदान जनजागृती, डिजिटल वाहनांद्वारे मतदान जनजागृती, मतदान जनजागृती बाबत माहिती देणारी शॉर्ट चित्रफित ग्राफिकच्या माध्यमातून तयार करून त्याद्वारे मतदान जनजागृती, एअर बलून द्वारे मतदान जनजागृती, रोलिंग स्टॅन्डी, सेल्फी स्टॅन्डी द्वारे मतदान जनजागृती इ.नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मतदान जनजागृती करण्यात आली असून याकामी झालेल्या सर्व खर्चाचा तपशील सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये नमूद आहे. तरी याबाबत झालेल्या एकत्रित र.रु.१५,८२,२०८/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख ब्याऐंशी हजार दोनशे आठ फक्त) (GST सह) च्या खर्चास तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.प्रशासक यांची कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७८** **विषय क्रमांक- ३८७८**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- माहिती व जनसंपर्क**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१६५/२०२४, दि.२१/०६/२०२४ अन्वये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व – २०२४ आयोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.माजसं/३/कावि/१६५/२०२४, दि.२१/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि. २५ ते २६ जून २०२४ या कालावधीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व - २०२४ चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रबोधन पर्वामध्ये करियर मार्गदर्शन, शिवकालीन शस्त्रास्त्र प्रदर्शन विविध समाज प्रबोधनात्मक पोवाडे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर |

| | |
|---|---|
| | कार्यक्रमासाठी कलाकार मानधन, पुस्तक खरेदी, कार्यक्रमाची प्रसिद्धी करणे इ.बाबत येणा-या अंदाजे र.रु.५,७०,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सत्तर हजार फक्त) च्या खर्चास तसेच येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८७९** **विषय क्रमांक- ३८७९**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८७९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/१४/कावि/१३१/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, सांगवी बोपोडी दरम्यान मुळा नदीवर बांधणेत आलेल्या पूलाची अनुषंगिक कामे करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८७९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/नि/१४/कावि/१३१/२०२४, दि.०५/०८/२०२४ अन्वये, मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.97/01/2023-2024 अन्वये सांगवी बोपोडी दरम्यान मुळा नदीवर बांधणेत आलेल्या पूलाची अनुषंगिक कामे करणेकामी मे.टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड नि.र.रू.19,63,56,396/- (अक्षरी र.रु.एकोणीस कोटी त्रेसष्ठ लाख छपन्न हजार तीनशे शहान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.19,62,34,111/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.19,62,34,111/- पेक्षा 5.15% जादा दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2022-2023 चे एस.एस.आर.दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 4.86% ने जादा येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.20,63,40,168/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.9728/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,22,285/- = एकुण र.रु.20,64,72,181/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८०** **विषय क्रमांक- ३८८०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- विद्युत मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/कावि/३१४/२०२४, दि.२३/०७/२०२४ अन्वये, मनपाचे विद्युत विभागाकडील कामांसाठी तरतुद वर्गीकरण, नवीन कामांचा समावेश, प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |

**ठराव क्र.३८८०**
**दिनांक - ०६/०८/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/कावि/३१४/२०२४, दि.२३/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २०,३०,३१, व ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उद्यानांमधील स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती करणे, एलईडी फिटींगची देखभाल दुरुस्ती करणे तसेच निळुफुले नाट्यगृह मधील युपीएस सिस्टिमचे बॅटरी बदलविणे इ. कामे चालू आहेत. तसेच नवीन थेरगाव रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर तयार करणे हे काम पूर्ण झालेले आहे. सदर कामांसाठी सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असल्याने या कामांना तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. विद्युत विभागाकडील मुख्य कार्यालय , ड क्षेत्रिय कार्यालय, ग क्षेत्रिय, ह क्षेत्रिय, क क्षेत्रिय कार्यालयांमध्ये चालू आर्थिक वर्षामध्ये आवश्यक कामे करणेसाठी खालील तक्त्यात नमूद कामे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामांचा समावेश करणेकामी व तरतूद वर्गीकरण करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी घेणेकामी शिफारस करण्यास मान्यता आवश्यक असलेने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय पानांक | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२४-२५ ची तरतुद | सन २०२४-२५ तरतुद घट र. रु. | सन २०२४-२५ तरतुद वाढ र. रु | सन २०२४-२५ एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेट्रो प्रकल्पाअंतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. (सन २०२२-२३) २३२४०३२३८ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१८/ ११५ | १००००००० | ५७५००००० | १५८००००० | ० | ४१७००००० |
| २ | प्रभाग क्र. २७ मध्ये विविध कॉक्रीट रस्त्याचे विद्युत विषयक कामे करणे. (२०२०-२१) २२२३०६८०० | स्थापत्य प्रकल्पाअंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१७/ ९८ | २००००००० | १७९८००० | १०००००० | ० | ७९८००० |
| ३ | नवीन थेरगाव रुग्णालय येथील ई.पी.बी.एक्स आणि ध्वनीक्षेपण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती करणे. (२०२४-२५) २४२५०१६८२ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७०/ १०७ | ५०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ४ | नवीन थेरगाव रुग्णालय येथील अग्नीप्रतिबंधक यंत्रणेची (फायर अलार्म पॅनल, स्प्रीक्लर, हायड्रन्ट सिस्टम) देखभाल दुरुस्ती करणे. (२०२४-२५) २४२५०१६९२ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७०/ ११७ | ३०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ५ | नवीन जिजामाता रुग्णालय पिंपरी येथील ई.पी.बी.एक्स. यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. २४२५०१६९३ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७१/ ११८ | ३०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ६ | ब प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी सी.सी.टी. व्ही. यंत्रणा उभारणे | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन योजना | ३३९ /१ | ५००००००० | २०००००० | १०००००० | ० | १०००००० |
| ७ | मनपा विविध क्रिडा सुविधांचे ठिकाणी CCTV यंत्रणा उभारणे. (२०२४-२५) | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन योजना | ३३९ /७ | ५००००००० | २०००००० | १५००००० | ० | ५००००० |
| ८ | मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये जुन्या लिफ्ट काढुन नवीन लिफ्ट बसविणे. (लिफ्ट क्र. ३,४,५,६,७ व ८) २४२५०१९६० | कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | ३०८ /१ | ५००००००० | ५०००००० | ० | ७५००००० | १२५००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | प्रभाग क्र. २३ मधिल नविन थेरगाव रुग्णालयात सुसज्ज ऑपरेशन थिएटर तयार करणे व अत्यावश्यक कामे करणे. २२२३१३३२६ | इमारत योजना | ११६/६ | ४००००००० | ४०००००० | ० | ३५५०००० | ७५५०००० |
| | १० | ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ३१ मधील स्ट्रीट लाईट दिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२३-२४) २३२४०३५०० | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३६२/२२० | ३०००००० | ५००००० | ० | ३००००० | ८००००० |
| | ११ | नट सम्राट निळू फुले नाट्यमंदिर येथील युपीएस सिस्टिमची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व युपीएस बॅटरी (सन २०२३-२४) २३२४०२९७८ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३१०/१६ | २५००००० | ४००००० | ० | ११००००० | १५००००० |
| | १२ | प्र. क्र. ८ वैष्णव माता शाळेसमोरील मोकळ्या जागेवर उद्यान विकसित करणे व योगाकेंद्र उभारणे. २२२३०६८२३ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३१३/४३ | ३००००००० | ७५००००० | ० | ४०००००० | ११५००००० |
| | १३ | मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उद्यानात आवश्यकतेनुसार विद्युत विषयक कामे करणे | उद्याने | नवीन | ३०००००० | ० | ० | ८५०००० | ८५०००० |
| | १४ | ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत थेरगाव स्मशानभुमी येथील गॅस दाहिनीचे चालन व देखभाल दुरुस्ती करणे. | लोकारोग्य | नवीन | ६०००००० | ० | ० | १५००००० | १५००००० |
| | १५ | मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृहातील ध्वनीक्षेपण व्यवस्थेची वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल दुरुस्ती करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग २ | नवीन | २५००००० | ० | ० | २००००० | २००००० |
| | १६ | ग क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रकयंत्रणा बसविणे. (सन २०२४-२५) | ट्राफिक सिग्नल | नवीन | ३०००००० | ० | ० | १२००००० | १२००००० |
| | | एकुण | | | | ८१५९८००० | २०२००००० | २०२००००० | ८१५९८००० |

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी विषयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेस मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८१** **विषय क्रमांक- ३८८१**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य प्रकल्प**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८१**<br>**दिनांक -**<br>**०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/८९९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी डेअरी फार्म येथे रेल्वे उड्डाणपूल बांधणे. नियोजित उड्डाणपूल बांधकामास अडथळा ठरत असलेले वृक्ष तोडणेकामी, वृक्षांच्या मुल्यांकनाची रक्कम संरक्षण विभागासोबत झालेल्या करारानुसार संरक्षण विभागास जमा करणेबाबत. |

**ठराव क्र.३८८१**
**दिनांक -**
**०६/०८/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/८९९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे वरील पुलाच्या बांधणीने बाधित होणारे वृक्ष हे संरक्षण खात्याने महापालिकेस हस्तांतरित केलेल्या जागेवर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेमध्ये झालेल्या करारानुसार मुद्दा क्र. iv) अन्वये कामास अडथळा ठरणारे वृक्ष काढणेविषयी खालील अट नमुद करणेत आली आहे. “The cost of trees (as assessed by DEO) standing on Defence land and required to be removed will have to be paid by Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC); which shall be responsible for removal of trees after obtaining due clearance from the competent authorities.” या अटीनुसार कामाने बाधित होणा-या वृक्षांचे मुल्यांकन वन परिक्षेत्र अधिकारी पुणे यांचेमार्फत करुन घेणेत आले असुन ते खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साखळी क्रमांक | पुर्ण काढावयास लागणा-या वृक्षांची संख्या | पुर्ण काढावयास लागणा-या वृक्षांचे मुल्यांकन (रु.) | पुनर्रोपण करावयाच्या वृक्षांची संख्या | पुनर्रोपण करावयाच्या वृक्षांचे मुल्यांकन (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०/००० ते ०/३०० | ७९ | ५,३६,२३६.८४ | ४७ | ३,४३,८०४.८८ |
| २ | ०/३०० ते १/२७० | ६३ | ३,५८,६८५.२५ | १७ | १,३१,३९३.८३ |
| | एकुण | १४२ | ८,९४,९२२.०० | ६४ | ४,७५,१९९.०० |

वरीलप्रमाणे उर्वरित ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करणेसाठी मा. डिफेन्स इस्टेट ऑफिसर यांना संरक्षण खात्याची जागा सुचविणेबाबत विचारणा करणेत आली. मा. डिफेन्स इस्टेट ऑफिसर यांनी महानगरपालिका व डिफेन्स इस्टेट ऑफिस यांचेमध्ये झालेल्या करारनाम्यामध्ये व Working Permission मध्ये पुनर्रोपण करण्यात येणा-या वृक्षांचा मोबदला तसेच सदर झाडे संरक्षण खात्याच्या जागेवर वृक्षपुनर्रोपण करणे याचा समावेश नसल्याचे महापालिकेस कळविले आहे. तसेच सदरचे पत्रात करारनाम्यामध्ये वृक्ष पुनर्रोपण व वृक्षांचा मोबदला यांचा समावेश करणेसाठी अंशत: सुधारणा (Partial Amendment) करणेविषयी महानगरपालिकेकडून विनंती अर्ज दाखल करणेचे कळविले आहे. त्यानंतर सदर दुरुस्ती प्रस्ताव ते संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठवुन त्यास मंजुरी घेऊनच पुढील निर्णय देणार आहेत. उपरोक्तप्रमाणे सदर दुरुस्ती प्रस्ताव संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठवुन त्यास मंजुरी मिळणेस बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे, पुलाच्या कामास विलंब होणार आहे. तसेच, यामुळे वृक्ष पुनर्रोपण वेळेत न झालेने काम करणेसाठी जागा उपलब्ध झाली नसल्यास कंत्राटदारास काम पुर्ण करणेसाठीची मुदतवाढ व त्या कालावधीतील भाववाढ द्यावी लागु शकते. यापुर्वी बोपखेल येथील पुलाच्या बांधकामामध्ये बाधित होणा-या वृक्षांच्या बदल्यात महानगरपालिकेतर्फे रक्षा संपदा विभागाने सुचविल्याप्रमाणे सुनिश्चित त्यांच्या मालकीच्या जागेमध्ये मनपामार्फत वृक्षारोपण करुन तसेच अडथळा ठरणा-या झाडांच्या किंमतीच्या मोबदल्यात आवश्यक रक्कम रक्षा संपदा विभागास अदा केलेली आहे. त्याप्रमाणेच सदर प्रकरणीदेखील उर्वरित पुनर्रोपण कराव्या लागणा-या वृक्षांसाठी आवश्यक र.रु. ४,७५,१९९/- संरक्षण विभागास अदा करावी लागणार आहे. सदरच्या प्राप्त मुल्यांकनानुसार पुलाच्या कामास अडथळा ठरणारे एकुण ६४ वृक्ष पुनर्रोपण करणेकरीता एकुण र.रु.४,७५,१९९/- इतकी रक्कम संरक्षण विभागाने भरणेबाबत महानगरपालिकेस कळविले आहे. सदर रक्कम संरक्षण विभागास जमा केल्यानंतरच वृक्षरोपण विषयी त्यांची परवानगी प्राप्त होऊन पुल बांधणीचे काम विनाविलंब सुरु ठेवता येणार आहे. सदरची र.रू.४,७५,१९९/- संरक्षण विभागास जमा करणेकामी विषयांकित कामाच्या लेखाशिर्षामधून महाराष्ट्र महापालिका अधिनियम ५(२) (२) नुसार फॉर्म नं. १४ अन्वये खर्च करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८२** **विषय क्रमांक- ३८८२**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- प्राथमिक शिक्षण**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/कावि/९अ/२६५/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, मनपाचे प्राथमिक शाळेतील इयत्ता 5 वी व 8 वी तील विद्यार्थ्यांना सन 2024-25 साठी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांचेकडून थेट पध्दतीने शिष्यवृत्ती मार्गदर्शिका पुस्तके खरेदी करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८२ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/कावि/९अ/२६५/२०२४, दि.०१/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने प्राथमिक शाळेतील इयत्ता 5 वी व 8 वी तील विद्यार्थ्यांना सन 2024-25 साठी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांचेकडून "शिष्यवृत्ती मार्गदर्शिका" पुस्तके खरेदी दरपत्रक मागविणेत आलेले आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांनी 15% सवलतीचे दरपत्रक सादर केले आहे. शिक्षण विभागाद्वारे सदर पुस्तक खरेदीस मान्यता मिळणेकामी दि.01.08.2024 अन्वये प्रस्तावित करण्यात आलेले असुन, त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. शिष्यवृत्तीची परीक्षा साधारणत: माहे सप्टेंबर 2024 मध्ये होणार असल्याने उपलब्ध कालावधीचा विचार करता विद्यार्थ्यांना त्वरित पुस्तके उपलब्ध होणे आवश्यक आहे. सबब, प्राथमिक शाळेतील इयत्ता 5 वी व 8 वी तील एकूण 2451 विद्यार्थ्यांना सन 2024-25 साठी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता शिष्यवृत्ती मार्गदर्शिका पुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्यांनी मागणी केलेनुसार त्यांना एकूण र.रु.9,47,753/- (अक्षरी र.रु.नऊ लाख सत्तेचाळीस हजार सातशे त्रेपन्न फक्त) आगाऊ देणे व तसा डिमांड ड्राफ्ट "संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे" यांचे नावे काढणेस मान्यता मिळणेसाठी व सदर पुस्तके खरेदी करणेकामी होणारा खर्च प्राथमिक शिक्षण विभागाकडील सन 2024-25 च्या "शालेय परीक्षा" या लेखाशिर्षातून करणे शक्य आहे. शिष्यवृत्ती परीक्षेकरीता पुस्तके देणेकामी येणारा खर्च एकुण र.रु.9,47,753/- हा पुरवठाधारक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांना आगाऊ अदा करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८३** **विषय क्रमांक- ३८८३**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१८/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र फेज-१ अंतर्गत मैलापाणी पंप हाऊचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८३ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१८/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. 07/01/2023-24 अन्वये मनपाचे कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र फेज-१ अतंर्गत मैलापाणी पंप हाऊचे चालण देखभाल व दुरुस्ती करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 07/01/2023-24 साठी 4 प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फ्लोमॅक इंजिनिअरिंग कोर्पोरेशन या ठेकेदाराची नि.र.रू.1,39,50,368/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणचाळीस लाख पन्नास हजार तीनशे अड्डसष्ट फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,39,50,368/- पेक्षा 4.4% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.आयुक्त यांनी दि.6/8/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.1,33,36,552/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु.1,33,36,552/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर लागू असल्यास अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८४** **विषय क्रमांक- ३८८४**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे चिंचवड SBR मैलाशुध्दीकरण केंद्रअतंर्गत मैलापाणी पंप हाऊसचे चालन देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८४ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१/कावि/२१९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. 07/08/2023-24 अन्वये मनपाचे चिंचवड SBR मैलाशुध्दीकरण केंद्रअतंर्गत मैलापाणी पंप हाऊसचे चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 07/08/2023-24 साठी 3 प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फ्लोमॅक इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन या ठेकेदाराची नि.र.रू.3,60,10,650/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी साठ लाख दहा हजार सहाशे पन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,60,10,650/- पेक्षा 4.2% कमी दराने निविदा आलेली असल्याने व तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम |

| | |
|---|---|
| | मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक:6/8/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु.3,44,98,203/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु.3,44,98,203/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर लागू असल्यास अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८५** **विषय क्रमांक- ३८८५**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- कामगार कल्याण**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह आयुक्त, कामगार कल्याण यांचेकडील पत्र क्र.काक/४/कावि/२४०/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांसाठी विभागीय परीक्षा नियम, २०२० आयोजित करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८५ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह आयुक्त, कामगार कल्याण यांचेकडील पत्र क्र.काक/४/कावि/२४०/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील कर्मचारी यांना विभागीय परीक्षा नियम, २०२० आयोजित करणेबाबत व त्याकामी कर्मचा-यांना या विषयाचे प्रशिक्षण घ्यावयाचे आहे. उक्त प्रशिक्षणामध्ये अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत प्रश्नपत्रिका क्रमांक एक, प्रश्नपत्रिका क्रमांक दोन व प्रश्नपत्रिका तीन क्रमांक यासाठी ४० तासांचे प्रशिक्षण आयोजित करणेत येणार आहे. सदर प्रशिक्षणासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका दोन हॉल उपलब्ध करुन देणार आहे. दोन्ही हॉलमध्ये एकाच दिवशी एकाच वेळी सदर प्रशिक्षण चालु राहतील. ४० तासाचे प्रशिक्षण हे सहा दिवस सकाळी १० ते संध्याकाळी ६ दरम्यान दोन्ही हॉलमध्ये चालेल. ते दि.९ ते ११ ऑगस्ट व १६ ते १८ ऑगस्ट या दरम्यान आयोजित करण्यात येईल. प्रशिक्षकांचा मेहनताना तसेच त्यांचा जाण्या येण्याचा खर्च, त्यांचा नाश्ता, दुपारचे जेवण यांवरील खर्च होणार आहे. सदर संस्थेची प्रशिक्षण व विभागीय परीक्षा घेण्यासाठी प्रति कर्मचारी र.रु.३०५०/- (अक्षरी र.रु.तीन हजार पन्नास फक्त) या प्रमाणे फी आकारणी असेल. महानगरपालिकेच्या ४०६ कर्मचा-यांचे प्रशिक्षणासाठी व स्टेशनरी, व्हाईट बोर्ड, इ.साठी अंदाजित खर्च र.रु.२,६१,७००/- आणि संस्थेची फी ४०६x३०५० = १२,३८,३००/- अशी एकुण अंदाजित खर्चाची(बीलाची) र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख रुपये) किंवा प्रत्यक्ष खर्च कामगार कल्याण विभागाकडील अधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण या लेखाशीर्षामधुन खर्ची टाकणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८६** **विषय क्रमांक- ३८८६**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- स्थापत्य इ मुख्य**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), स्थापत्य इ मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१२/कावि/५४४/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे दुरुस्ती करणे व मनपा क्षेत्रातील डांबरी रस्त्यावरील खड्डे "JET PATCHER POTHOLE PATCHING MACHHINE". द्वारे भरणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८६ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), स्थापत्य इ मुख्य यांचेकडील पत्र क्र.स्था/१२/कावि/५४४/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 76/02/2023-24 अन्वये “मनपाच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांचे दुरुस्ती करणे व मनपा क्षेत्रातील डांबरी रस्त्यावरील खड्डे " JET PATCHER POTHOLE PATCHING MACHHINE". द्वारे भरणेकामी वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. वरील प्रमाणे निविदा क्र. 76/02/2023-24 साठी 2 पात्र झालेल्या निविदांपैकी M/s.Anjanikrupa Logistics Pvt.Ltd. या ठेकेदाराची नि.र.रू. 4,95,53,857/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंच्यान्नव लाख त्रेपन्न हजार आठशे सत्तावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु. 4,95,53,857/- पेक्षा 1.24% कमी दराने निविदा आलेली असल्याने व स्विकृतयोग्य दराशी तुलना करता 0.00% कमी दर येत असलेने तुलनात्मकदृष्ट्या वाजवी दराची असल्याचे तसेच ठेकेदार मुदतीमध्ये प्रस्तुत काम मानांकनाप्रमाणे पूर्ण करणेस सक्षम असल्याने स्विकारणेबाबत मा.अति.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. वरील ठेकेदाराकडून र.रु. 4,89,39,389/- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 0/- = एकुण र.रु. 4,89,39,389/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८७** **विषय क्रमांक- ३८८७**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- उद्यान**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), उद्यान यांचेकडील पत्र क्र.उद्यान/०६/कावि/२६९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाकडील उद्याने/रस्ते देखभाल कामांना नविन निविदा अंतिम होईपर्यंत पुर्वी असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ व त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८७ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), उद्यान यांचेकडील पत्र क्र.उद्यान/०६/कावि/२६९/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे उद्यान विभागामार्फत निविदाद्वारे उद्यान देखभाल संरक्षण काम करारनामा करून वेळोवेळी कामकाज करून आदेश देऊन कामे करून घेणेत येतात. उद्यान व वृक्षसंवर्धन विभागातील सदर निविदेंचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असल्याने व सदर निविदा नव्याने प्रसिद्धी साठी प्रस्तावित आहेत. तथापी सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या |

| | |
|---|---|
| | उद्याने/रस्ते देखभाल कामास मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सोबतचे प्रपत्र अ मधील कामांची उद्यान विभागाची उद्यान व वृक्ष संवर्धन विभागातील सदर निविदेंचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असल्याने व सदर निविदा नव्याने प्रसिद्धी साठी प्रस्तावित आहेत. निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत जे आधी होईल तोपर्यंत मुळ निविदेच्या अटी/शर्तीस व करारनाम्यास अधिन राहुन पुढील खर्चाचे मुद्रांक स्विकारुन मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८८** **विषय क्रमांक- ३८८८**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- समाज विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७४/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेचे अंमलबजावणीकामी कॉम्प्युटर ऑपरेटर ऍण्ड प्रोग्रामिंग असिसटंट (कोपा) प्रशिक्षणार्थी यांना मानधन भत्ता अनुज्ञेय करणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८८ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७४/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि२०२४/प्र.क्र.९६/कार्या-२ दि.२८/०६/२०२४ अन्वये "मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण" या योजनेची अंमलबजावणी करणेकामी निर्देश दिलेले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विस्तीर्ण क्षेत्रफळ व मनपा हद्दीमध्ये राहणा-या महिलांची संख्या लक्षणीय असलेने सदरचे कामकाज हे अधिक सुलभरीत्या होणेकरीता तसेच सदर योजनेची व्याप्ती पाहता व प्राप्त होणा-या संभाव्य अर्जांची संख्या पाहता या योजनेचे कामकाज मनपाचे मोरवाडी व कासारवाडी मधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील कॉम्पुटर ऑपरेटर ऍण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा)कोर्स पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीची नियुक्ती करणेत आली आहे. मा.आयुक्तसो. यांचेकडील दि.३०/०७/२०२४ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये ८ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत नियुक्त करणेत आलेले सर्व कॉम्पुटर ऑपरेटर ऍण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा) प्रशिक्षणार्थी यांना सध्या देणेत येत असलेले प्रती माह विद्यावेतन र.रु.७,७००/- व "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेच्या कामासाठी र.रु.७,३००/- असे एकूण र.रु.१५,०००/- योजनेचे कामकाज सुरु असेपर्यंत व पुढील आदेशापर्यंत अदा करणेकामी तसेच सदर कोपा प्रशिक्षणार्थी ज्या मूळ विभागात कामकाज करणेकामी रुजू झालेले आहेत त्या संबंधित विभागांमार्फत त्यांचे मानधन अदा करणेस मान्यता दिलेली आहे. तरी "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेचे अंमलबजावणीकामी कॉम्प्युटर ऑपरेटर ऍण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा) प्रशिक्षणार्थी यांना योजनेचे कामकाज सुरु असेपर्यंत उपरोक्त प्रमाणे र.रु.१५,०००/- मानधन भत्ता अनुज्ञेय करणेबाबतचे खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८८९** **विषय क्रमांक- ३८८९**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- समाज विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८८९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७५/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेचे अर्ज बचतगटांतील महिलांमार्फत भरणेबाबत. |
| **ठराव क्र.३८८९ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७५/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि२०२४/प्र.क्र.९६/कार्या-२ दि.२८/०६/२०२४ अन्वये "मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण" या योजनेची अंमलबजावणी करणेकामी निर्देश दिलेले आहेत. "त्याअनुषंगाने मा.आयुक्तसो यांचेकडील दि.१२/०७/२०२४ रोजीचे प्रस्तावान्वये सदर योजनेची व्याप्ती व प्राप्त होणा-या अर्जांची संख्या पाहता या योजनेचे कामकाज महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे या संस्थेमार्फत प्रती फॉर्म र.रु.५०/- याप्रमाणे करणेस व समन्वयक यंत्रणेस (माविमला) ७% सनियंत्रण कॉस्ट प्रमाणे अदा करणेस तसेच सदर योजनेचे ऑनलाईन अर्ज भरणेकामी शासनाने निश्चित केलेले प्रती अर्ज र.रु.५०/- थेट अर्ज भरणा-या महिलांच्या खात्यात जमा झाल्यास फक्त उर्वरीत ७% या दराने संनियंत्रण रक्कम अदा करणेस व बिल अदायगी करताना नियमाधीन कपाती करणेबाबत तसेच याकरीता आवश्यक असणारी तरतूद समाज विकास विभागाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामधील महिला व बालकल्याण योजनेतील "इतर योजना व कार्यक्रम" या उपलेखाशिर्षामधील उपलब्ध तरतूदीमधून खर्ची टाकणेस व मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज बचत गटातील महिला मार्फत भरणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णयः** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८९०** **विषय क्रमांक- ३८९०**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- समाज विकास**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८९० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७६/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" या योजनेचे अर्ज डाटा एण्ट्री ऑपरेटरमार्फत भरणेकामीचे खर्चास मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र.३८९० दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.अति.आयुक्त(१), समाज विकास यांचेकडील पत्र क्र.सविवि/०२/कावि/१७६/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.मबावि२०२४/प्र.क्र.९६/कार्या-२ दि.२८/०६/२०२४ अन्वये "मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण" या योजनेची अंमलबजावणी करणेकामी निर्देश दिलेले आहेत. समाज विकास विभागामार्फत "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची अंमलबजावणी करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदरचे कामकाज करणेकामी ६० डाटा एण्ट्री ऑपरेटर अथवा आवश्यकतेनुसार कर्मचा-यांची गरज भासणार आहे. परंतू तातडीची गरज व वेळेची मर्यादा पाहता यासाठी नवीन ई-निविदा प्रसिध्द करणे शक्य होणार नाही. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.०८/२०२३-२४ प्रसिध्द करणेत आली होती. त्यास अनुसरून आदेश क्र.शिक्षण/०५/कावि/५३७/२०२३ दि.२८/११/२०२३ अन्वये मे.सक्षम फॅसिलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई यांचेमार्फत १०७ डाटा एण्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करणेत आलेली आहे. दि.०५/०७/२०२४ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांचे झालेल्या |

| | |
|---|---|
| | बैठकीमध्ये श्री.प्रसाद देशमुख, मे.सक्षम फॅसिलिटी सर्व्हीसेस, मुंबई यांनी सदर कामकाजाकरीता डाटा एण्ट्री ऑपरेटर पुरविणेबाबत सहमती दर्शविली आहे. त्यास अनुसरुन सदरचे कामकाज करणेकामी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत मे.सक्षम फॅसिलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई यांसमवेत करणेत आलेल्या करारनाम्यामधील अटी व शर्तीनुसार प्रती डाटा एण्ट्री ऑपरेटरचे नमूद केलेल्या र.रु.२९,०५९/- + GST रक्कम या मान्य दरानुसार १६० डाटा एण्ट्री ऑपरेटर पुरविणेकामी मा.आयुक्तसो यांचेकडील दि.०५/०७/२०२४ व दि.१६/०७/२०२४ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता देणेत आलेली आहे. तसेच याकरीता आवश्यक असणारी तरतूद समाज विकास विभागाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकामधील महिला व बालकल्याण योजनेतील “इतर योजना व कार्यक्रम” या उपलेखाशिर्षामधील उपलब्ध तरतूदीमधून खर्ची टाकणेस मान्यता दिलेली आहे. तरी “मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण” या योजनेचे अर्ज डाटा एण्ट्री ऑपरेटर मे.सक्षम फॅसिलिटी सर्व्हीसेस, मुंबई या संस्थेमार्फत भरणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ३८९१** **विषय क्रमांक- ३८९१**

**दिनांक – ०६/०८/२०२४** **विभाग- औद्योगिक प्रशिक्षण संस्था**

| | |
|---|---|
| **विषय क्र.३८९१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह आयुक्त, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी यांचेकडील पत्र क्र.औप्रसं/०४/कावि/६८०/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, निदेशक पदावर तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणूकीबाबत. |
| **ठराव क्र.३८९१ दिनांक - ०६/०८/२०२४** | मा.सह आयुक्त, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी यांचेकडील पत्र क्र.औप्रसं/०४/कावि/६८०/२०२४, दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी येथे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणे करिता मा.अति.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्रमांक:औप्रसं/०४/कावि/१२२/२०२४, दि.०८/०२/२०२४अन्वये दि.२०/१२/२०२३ ते दि.१९/०६/२०२४ अशी सहा (०६) महिने कालावधी करिता दरमहा र.रू.४७,२५०/- एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देणेत आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी दि.१९/०६/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. खाली नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांनी नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे. **प्रपत्र‘अ’** |

| अनु. क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. सातकर उज्वला लक्ष्मण | मानधन निदेशक | दिनांक: २१/०६/२०२४ ते दिनांक: २०/१२/२०२४ |
| २ | श्री. काळोखे विक्रमसिंह वसंत | मानधन निदेशक | |
| ३ | श्री. लांडगे निलेश खुशालचंद | मानधन निदेशक | |
| ४ | श्री. दुधाळ भानुदास धर्माजी | मानधन निदेशक | |
| ५ | श्रीमती. बोरसे वृंदावनी बन्सीलाल | मानधन निदेशक | |
| ६ | श्री. ताठे शहाजी पांडूरंग | मानधन निदेशक | |
| ७ | श्री. शिंदे प्रकाश शिवाजी | मानधन निदेशक | |
| ८ | श्रीमती. जाधव सीमा यशवंत | मानधन निदेशक | |

<table>
<tr><td></td><td>
<table><tr><td>९</td><td>श्री. गावडे किसन दत्तात्रय</td><td>मानधन निदेशक</td><td></td></tr></table>
उपरोक्त अनु.क्र.०१ ते ०९ कर्मचा-यांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम निकालास अधिन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या वेळोवेळी घेतलेल्या अभिप्रायानुसार दिनांक:२१/०६/२०२४ ते दिनांक:२०/१२/२०२४ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता दिनांक:२१/०६/२०२४ ते दिनांक:३०/०६/२०२४ कालावधीकरीता र.रू.४७,२५०/- एकत्र मानधनावर व त्यानंतर दिनांक:०१/०७/२०२४ ते दिनांक:२०/१२/२०२४ पर्यंतचे कालावधीकरीता मा.आयुक्त सो. यांचे मानधन वाढीच्या मान्य धोरणानुसार वाढीव मानधनावर हंगामी नियुक्ती देणे आवश्यक आहे. मा. आयुक्त सो यांचेकडील दि.२४/०६/२०२४ चे मान्य प्रस्तावानुसार सदर विषयास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.
</td></tr>
<tr><td>निर्णय:</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक.एस.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक- ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दि.१८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**सही/-**
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.